

महाराष्ट्र
# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र
वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड १, अंक १ एप्रिल २०२०(क्र.१)

## अनुक्रमणिका

या नव्या बातमीपत्राविषयी... ३

**संपादकीय**

नुसती हिरवाईची टक्केवारी; वन्यजीवनाचे चित्र धूसर ४

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

चांदोली राष्ट्रीय उद्यान ४

पवनचक्क्यांच्या खांबांवर कॅमेरे लावून जंगलावर नजर

टिपेश्वर अभयारण्य ५

प्रभावी व्यवस्थापन क्रमवारीत टिपेश्वर सहाव्या स्थानी

हद्दवाढ विचाराधीन; लगतच्या गावांमध्ये वाघाची भीती

टिपेश्वर अभयारण्य/ज्ञानगंगा अभयारण्य ६

पाच महिन्यांत वाघाचा टिपेश्वर ते ज्ञानगंगा प्रवास

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ६

अतिक्रमणाबाबत हमीपत्राच्या अटीला विरोध

ताडोबातून गोरेवाड्यात नेलेला बछडा आजारी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प/उमरेड कऱ्हांडला अभयारण्य ७

ताडोबातील वाघ ८० किलोमीटरचा प्रवास करून उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात

तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य ७

अभयारण्यात वेगाने दुचाकी चालवणाऱ्या दहा जणांना अटक; दोघांचा शोध सुरू

मुंबईनजीकच्या जंगलांना हवामान बदलापेक्षा मानवनिर्मित वणव्यांचा धोका जास्त

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ८

कोका अभयारण्यातून रात्रीची वाहतूक बंद

अपुऱ्या लिंगगुणोत्तरामुळे नवेगाव नागझिऱ्यात वाघांच्या संख्यावाढीला मर्यादा

नांदुरमधमेश्वर वन्यजीव अभयारण्य ९

नांदुरमधमेश्वर राज्यातील पहिले ‘रामसर’ स्थळ

वर्धापनदिनी पक्षीगणनेत १७,६०७ पक्ष्यांची नोंद

‘रामसर’ दर्जामुळे वन विभागाची जबाबदारी वाढली

पेंच व्याघ्र प्रकल्प १०

चौकशीचा ससेमिरा चुकवण्यासाठी सीमेपलीकडे टाकला वाघिणीचा मृतदेह

बोर व्याघ्र प्रकल्प ११

वन कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थांचा अभ्यासदौरा

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ११

सागाच्या दीडदोनशे वृक्षांची बेकायदा तोड

‘मालूर फॉरेस्ट’ ग्रामस्थांचा पुनर्वसनाला नकार

राधानगरी (दाजीपूर) अभयारण्य १२

दाजीपूरच्या जंगलात वाघाटीचे दर्शन

लोणार अभयारण्य १२

लोणार विवरावर रोहित पक्ष्याचे दर्शन

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान १२

‘‘मेट्रो कारशेड’साठी आरे हाच पर्याय योग्य’

आरे वसाहतीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय

येऊर हिल्स परिसरात रात्री क्रिकेट सामन्यांवर बंदी

**राज्यव्यापी बातम्या**

जनुकीय चाचणीसाठी महाराष्ट्राचा वन विभाग स्वतःची प्रयोगशाळा उभारणार १३

११ वर्षांत चार लाख हेक्टर जंगल भस्मसात १४

वन्य पशुंसाठी पाळीव पशुंचे डॉक्टर; वन विभाग टीकेचा धनी १४

नव्या सर्वेक्षणात ६४ टक्के पाणथळी वगळल्या; सुधारीत नियमावलीचा परिणाम १५

वन्यजीव गुन्ह्यांच्या क्रमवारीत महाराष्ट्र दुसरा १५

पश्चिम घाटात सापडलेल्या बेगोनियाच्या नव्या जातिला डॉ. मधुकर बाचूळकर यांचे नाव १५

माणूस-बिबट्या संघर्ष

अहमदनगर जिल्ह्यात माणूस-बिबट्या संघर्ष तीव्र १६

प्रवरा नदीकाठी शेतात बिबट्याचे बछडे १६

सोयगाव शिवारात वासरू मारले १६

बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार १६

पंधरवड्यात बिबट्याचे सात बछडे आढळले १७

बारामती व शिरूर तालुक्यांत एकेक बिबट्या जेरबंद १७

कुक्कुटपालन केंद्रात बिबट्याचा हल्ला १७

स्नानगृहात अडकलेल्या बिबट्याची सुटका १७

अनुसूचित वन्यजीवांविषयी बातम्या

जगभरात खवले मांजरांची संख्या घटली; भारतात तस्करीचे मोठे प्रमाण १८

वाघापेक्षाही खवले मांजराच्या तस्करीचे प्रमाण जास्त १८

भरवस्तीत खवले मांजर १८

खवले मांजर तस्करीप्रकरणी दोनदा जामीन नाकारला १८

चंद्रपूर जिल्ह्यात नदी हुदळ्याचे छायाचित्र काढण्यात यश १९

गव्यामुळे पिकांचे नुकसान १९

चार वन्यजीव तस्करांना अटक; आरोपीकडून घोरपडींसह इतर वन्यप्राणीही जप्त १९

खाणकामामुळे वाघांच्या संचारमार्गात अडथळा १९

वाघाच्या शस्त्रक्रियेवेळी वन्यजीव कायद्याचे उल्लंघन; शस्त्रक्रियाही अयशस्वी २०

वाघाच्या हल्ल्यात तीन जखमी २०

ब्रह्मपुरीत वाघाची शिकार २०

बिबटे व अस्वलांची शिकार २१

**राष्ट्रीय बातम्या**

मुंगुसांच्या केसांचे ५३ हजारहून अधिक कुंचले महाराष्ट्रासह इतर राज्यांतून जप्त २१

भारतात दरवर्षी ७८ हजार घुबडांची हत्या २१

**श्रद्धांजली** २३

आमची पारुबाई

**दृष्टीकोन** २४

लोकांची जैवविविधता नोंदवही वास्तव व अनुभव



**संरक्षित क्षेत्राचे वार्तापत्र**

**खंड १, अंक १, एप्रिल २०२० (क्र. १)**

संपादकः रेश्मा जठार

सहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

सहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक रेखाचित्रः अश्विनी मेनन, Ashvini Menon Visual Design Studio (AMVDS)

**प्रकाशकः कल्पवृक्ष**

संपादकीय पत्ताः C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

दूरभाष/फॅक्सः ०२० २५६५४२३९

**ई मेल**:marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळः** http://kalpavriksh.org

***

टीपः ‘संरक्षित क्षेत्राचे वार्तापत्र’ या बातमीपत्रात प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

‘महाराष्ट्रः संरक्षित क्षेत्राचे वार्तापत्रा’च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**

C/o फाऊण्डेशन फॉर इक्लॉलॉजिक सेक्युरिटी http://fes.org.in/

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

# या नव्या बातमीपत्राविषयी...

'**संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**' या वन्यजीवविषयक त्रैमासिक बातमीपत्राची संकल्पना 'पी.ए. अपडेट' अर्थात 'प्रोटेक्टेड एरिआ अपडेट' या इंग्रजी द्वैमासिक बातमीपत्रावर आधारलेली आहे. 'कल्पवृक्ष' ही बिगर-सरकारी संस्था गेली २५ वर्षे सातत्याने 'पी.ए. अपडेट' प्रकाशित करत आहे. हे नवे त्रैमासिकही 'कल्पवृक्ष'च्या पुढाकाराने सुरू होत आहे.

'पी.ए. अपडेट'ची सुरुवात १९९४ मध्ये 'जे.पी.ए.एम. अपडेट' अर्थात 'जॉइंट प्रोटेक्टेड एरिया मॅनेजमेंट अपडेट' या नावाने झाली. त्या वर्षी झालेल्या 'लोकसहभागातून संरक्षित क्षेत्रांचे व्यवस्थापन' विषयक एका राष्ट्रीय कार्यशाळेचा अनुभव हा 'कल्पवृक्ष'ला 'जे.पी.ए.एम. अपडेट' सुरू करण्यासाठी प्रेरणादायी ठरला.

प्रोटेक्टेड एरिआज् म्हणजे १९७२ च्या वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत अधिसूचित केलेली संरक्षित क्षेत्रे. लोकसहभागाने त्यांच्या व्यवस्थापनाबाबत माहिती, ज्यात बातम्यांचाही समावेश असेल, असा मजकूर 'जे.पी.ए.एम. अपडेट'मध्ये असावा, असे ठरले. मात्र, मिळणाऱ्या बहुतांशी बातम्यांचे स्वरूप आणि काही वाचकांचे अभिप्राय, सूचना लक्षात घेऊन १९९९ पासून त्याचे नाव बदलून 'प्रोटेक्टेड एरिआ अपडेट' असे काहीसे व्यापक करण्यात आले.

संरक्षित क्षेत्रे म्हणजे वन्यजीव अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प, हत्ती प्रकल्प, राखीव वा संरक्षित जंगल इत्यादी. भारतीय उपखंडातील संरक्षित क्षेत्रांशी संबधित घटना जसे की या क्षेत्रांची निर्मिती किंवा पुनर्रचना, त्यांच्या संरक्षण, संवर्धनात येणाऱ्या अडीअडचणी, आव्हाने, या क्षेत्रांवर बरेवाईट परिणाम करू शकतील असे धोरणात्मक निर्णय, वन्यजीवविषयक अभ्यास, संशोधन याविषयी प्रामुख्याने इंग्रजीतील काही दैनिकांत (अलीकडे मुख्यतः त्यांच्या संकेतस्थळांवर) प्रकाशित झालेल्या निवडक बातम्यांचे संकलन व त्यांवर संपादनाचे सोपस्कार करून प्रत्येक बातमीच्या मूळ प्रकाशनाचा स्रोत देऊन त्या 'पी.ए. अपडेट'मध्ये दिल्या जातात.

वन्यजीवविषयक अभ्यासक, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, वनाधिकारी व कर्मचारी आणि पर्यावरण व आदिवासी-हित विषयक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांचा 'पी.ए. अपडेट'च्या वाचकवर्गात समावेश आहे.

'पी.ए. अपडेट' इंग्रजी भाषेत असल्यामुळे त्याला मर्यादा आहेत. संरक्षित क्षेत्रांच्या परिसरात, जवळपास राहणारे बहुसंख्य लोक हे प्रादेशिक भाषक आहेत. संरक्षित क्षेत्रांमध्ये दररोज फिरून काम करणारा वन विभागाचा बहुसंख्य कर्मचारी वर्ग हा प्रादेशिक भाषक आहे. आजच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीवर संरक्षित क्षेत्रांचे महत्त्व, त्यांच्या समोरील आव्हाने संरक्षित क्षेत्रांशी थेट व जवळून संबंधित असलेल्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रादेशिक भाषांना पर्याय नाही. या जाणिवेतून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांशी संबंधित बातम्यांचे 'पी.ए. अपडेट'सारखे बातमीपत्र मराठी भाषेत प्रकाशित करण्याचे ठरले आहे. मराठी वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांशी संबंधित बातम्या व इंग्रजी 'पी.ए. अपडेट'मधील महाराष्ट्राशी संबंधित निवडक बातम्या संकलन, संपादन करून '**संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**' या त्रैमासिकात दिल्या जाणार आहेत. प्रत्येक बातमीबरोबर तिच्या मूळ प्रकाशनाचा स्रोत त्यात दिला जाणार आहे.

'पी.ए. अपडेट' आणि प्रस्तुत मराठी बातमीपत्र ही दोन्ही परिपूर्ण नाहीत, याची आम्हाला जाणीव आहे. खेरीज, एकदा प्रकाशित झालेल्या बातम्या पुन्हा देण्याचे प्रयोजन काय, असा प्रश्न तुम्हाला पडणेही अपेक्षित आहे. या बातमीपत्रांचा हेतू असा की वन्यजीवांसाठी संरक्षित क्षेत्रातील घडामोडींविषयी बातम्या एकत्र पाहण्याचा पर्याय उपलब्ध असावा. तसेच, इंग्रजीतील बातमीपत्र जवळपास दोन दशके सातत्याने प्रकाशित होत असल्यामुळे या काळात इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये संरक्षित क्षेत्रांविषयीचे वृत्तांकन कसे होते, त्यात काही बदल झाले का याचे दस्तावेजीकरण आपोआपच या बातमीपत्राच्या रुपाने उपलब्ध झाले आहे. तसे, मराठीतील वृत्तांकनाचेही व्हावे, अशी अपेक्षा आहे. मुख्य म्हणजे, ही सुरुवात आहे. वन्यजीव संरक्षणाबाबत अशी बातमीपत्रे जास्तीत जास्त प्रादेशिक भाषांमध्ये प्रकाशित झाली तर हवी आहेतच.

तेव्हा, हे '**संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**' कसे वाटले या विषयी तुमचा अभिप्राय, मते, सूचना आम्हाला जरूर कळवा. तुमच्या संपर्कातील विद्यार्थी, शिक्षक, वार्ताहर, पर्यावरण-वन्यजीव प्रेमी व या विषयात रुची असणारे इतर वाचक, कार्यकर्ते यांच्यापर्यंत हे बातमीपत्र पोहोचावे, असे तुम्हाला वाटत असेल; तर त्या सर्वांचे ईमेल, पत्ते आणि संपर्क क्रमांक आम्हाला पाठवा. या वर्षातील चार अंक त्यांना पाठवण्याची व्यवस्था आम्ही करू. तसेच, तुम्ही स्वतः शिक्षक, पत्रकार, कार्यकर्ते असाल आणि तुमच्या कामाच्या निमित्ताने संरक्षित क्षेत्रांच्या परिसरातील विद्यार्थी, वाचक व इतर रहिवाशांच्या संपर्कात असाल, त्यांच्यापर्यंत हे बातमीपत्र नेण्यास, जनजागृतीसाठी त्याचा वापर करण्याची तुमची इच्छा असेल तर त्यासाठी तुमची योजना, तुम्हाला लागणाऱ्या प्रतींची संख्या आणि अर्थातच तुमचा पत्ता आम्हाला कळवा. त्या तुमच्यापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था आम्ही करू.


**अधिक माहिती व संपर्कासाठी:**

**संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**, C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत. फॅक्सः ०२० २५६५४२३९.

**ई-मेलः**marathipaupdate@gmail.com

## संपादकीय

### नुसती हिरवाईची टक्केवारी; वन्यजीवनाचे चित्र धूसर

इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट २०१९ अर्थात भारतातील वनांच्या स्थितीचा आढावा घेणारा द्वैवार्षिक अहवाल केंद्रीय वन, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाने गेल्या वर्षअखेरीस प्रकाशित केला. त्यानुसार, वर्ष २०१७ आधीच्या दोन वर्षांच्या तुलनेत गेल्या दोन वर्षांत देशाच्या वनाच्छादनात ०.५६ टक्के व वृक्षाच्छादनात ०.६५ टक्के वाढ झाली आहे.

ही आकडेवारी पाहून देशातील वनांबाबत सकारात्मक स्थिती असल्याचे चित्र निर्माण झाले असले; तरी ते खरे नाही.

पहिली बाब म्हणजे २०११ पासून प्रकाशित झालेल्या आकडेवारीच्या तुलनेत टक्केवारीतील ही ताजी वाढ विशेष दखल घ्यावी अशी नाही.

दुसरी बाब अशी की या अहवालासाठी वनाच्छादनाचे मोजमाप करताना लक्षात घेतलेली 'वनाच्छादना'ची संकल्पना मुळात त्रोटक आहे. अहवालानुसार, एक हेक्टर किंवा त्याहून अधिक जमिनीवर असलेल्या झाडांच्या फांद्यापानांचा पसारा हा त्या जमिनीचे किमान १० टक्के क्षेत्र व्यापत असेल तर त्याला 'वन' असे म्हणून त्याची गणना वनाच्छादनात केली आहे. मात्र, यामध्ये झाडांच्या कोणत्या प्रजाति, जाति आहेत हे लक्षात घेतलेले नाही. म्हणजे एखादी आमराई किंवा सुरूचे बन किंवा ऑस्ट्रेलिअन अकेशिआच्या लागवडीखालील क्षेत्रांचाही वनाच्छादनात समावेश केला आहेत. वनाच्छादनाला जमिनीच्या मालकीचा निकष नाही.

एक हेक्टरहून कमी क्षेत्रावर आणि वन विभागाच्या अखत्यारित नसलेल्या जमिनीवर असलेल्या वृक्षांचा समावेश 'वृक्षाच्छादना'त केला आहे.

या खेरीज, वन विभागाच्या अखत्यारित नसलेल्या जमिनीवरील विखुरलेल्या वृक्षांचा समावेश 'वनाबाहेरील वृक्ष' या प्रकारात केला आहे. या प्रकाराला क्षेत्रफळाची मर्यादा नाही. इथे वृक्षांचा परीघ जो मोजणाऱ्याच्या छातीच्या उंचीवरील - म्हणजे जमिनीच्या वर अंदाजे चार किंवा साडेचार फूट - खोडाचा परीघ धरला जातो, त्याची किमान मर्यादा पाच सेंटिमीटर धरली आहे. म्हणजे, लहानसहान झाडेही त्यामध्ये मोजली आहेत.

या सर्व निकषांचा एकत्रित परिणाम म्हणून टक्केवारीत देशात हिरव्या आच्छादनाची व्याप्ती वाढलेली दिसते. मात्र, प्रत्यक्षात या वनांची आणि त्यातील वन्यजीवनाची स्थिती कशी आहे, याची सुतराम कल्पना या अहवालातून येत नाही.

या अहवालात वनाच्छादनाच्या मोजमापापुरते ज्याला 'वन' म्हटले आहे, ते पर्यावरणशास्त्रातील 'वन' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी पुरेसे नाही. वनात वनस्पतींच्या कोणत्या प्रजाति, जाति आहेत, एकमेकांच्या तुलनेत त्यांचे प्रमाण किती आहे, कोणकोणत्या वयाची झाडे किती प्रमाणात आहेत अशा विविध बाबी पर्यावरणाशास्त्रात महत्त्वाच्या ठरतात. या बाबींवर वनातील जैवविविधता, वनाची उत्पादकता, त्यापासून साधनसंपत्ती अशा वस्तूरूपात व शुद्ध हवा, पाणी इत्यादी पर्यावरणीय सेवांच्या रूपाने मिळणारे इतर फायदे अवलंबून असतात. नैसर्गिक वन ही समतोल परिसंस्था असते.

त्या उलट, एकाच जातिची झाडे असलेली लागवड केवळ त्या जातिवर अवलंबून मर्यादित जैवविविधतेला आसरा देते. त्याचे पर्यावरणीय मूल्यही नैसर्गिक वनापेक्षा कमी असते. 'कन्वेन्शन ऑन बायोलॉजिकल डायवर्सिटी' अर्थात जैवविविधता विषयक आंतरराष्ट्रीय कराराने वनाच्या औपचारिक व्याख्येबरोबर 'वन' या परिसंस्थेचे, त्यातील वन्यजीवांच्या विविधतेचे पर्यावरणशास्त्रीय महत्त्व अधोरेखित करणाऱ्या, जगभरातील विविध मानवी समूहांच्या वनाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनांचा समावेश असलेल्या इतर व्याख्यांचीही दखल घेतली आहे. भारत या करारात सहभागी असला तरी त्याचे प्रतिबिंब देशातील वनांच्या स्थितीबाबत अहवालात दिसून येत नाही.

एरवी, देशातील वनांची स्थिती सुधारत असल्याचे दाखवणारे या अहवालाने आपल्यासमोर ठेवलेले चित्र खरे असते तर; या बातमीपत्राला मजकुराची – विशेषतः माणूस आणि वन्यजीव यांच्यातील संघर्षविषयक बातम्यांची नक्कीच वानवा भासली असती!

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### चांदोली राष्ट्रीय उद्यान

#### पवनचक्क्यांच्या खांबांवर कॅमेरे लावून जंगलावर नजर

पवनचक्क्यांचा वापर करून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे प्रशासन आसपासच्या जंगलांवर नजर ठेवत आहे.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचा भाग असलेल्या चांदोली राष्ट्रीय उद्यानात प्रकल्प प्रशासनाने पवनचक्क्यांच्या खांबांवर चार कॅमेरे लावले आहेत. उंचावर लावल्यामुळे या कॅमेऱ्यांच्या नजरेच्या टप्प्यात मोठा प्रदेश येतो. प्रत्येक कॅमेरा नियंत्रण कक्षातूनच ३६० अंशांच्या कोनामध्ये फिरवून झूमही करता येतो.

या उपकरणांच्या माध्यमातून रात्रीच्या वेळेलासुद्धा जंगलावर नजर ठेवता येते.

व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने रात्रीच्या वेळेला उड्डाण करण्याची क्षमता असलेले दोन ड्रोनसुद्धा वापरात आणले आहेत. हे ड्रोन एका वेळेला साधारणपणे एक तास हवेत गस्त घालू शकतात. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या मुख्य वनसंरक्षकांनी सांगितले की शिकारी रोखण्यासाठी रात्रीच्या वेळेला गस्त घालण्यात येत आहे व ५५पेक्षा अधिक सुरक्षा छावण्या उभारण्यात आल्या आहेत. या कॅमेऱ्यांची संख्या लवकरच वाढवण्याचा प्रस्ताव आहे.

शिकार करण्याच्या उद्देशाने कोकणातून लोक या व्याघ्र प्रकल्पात येतात. त्यामुळे कोकणाला जोडणाऱ्या मार्गावर बऱ्याच ठिकाणी तपासणी करण्यात येते. त्यात अलिकडेच सशाची शिकार केलेल्या काही जणांना पकडण्यात आले. कोयना धरणाच्या जलाशयात नौकांच्या मदतीने अशा आगंतुकांना अटकाव करण्यासाठी गस्त घालण्यात येते. त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बोटींची संख्याही वाढवण्यात आली आहे.

कोयना वन्यजीव अभयारण्य परिसरात १६ गावे होती. यातील १४ गावांचे पुनर्वसन झाले असून आता फक्त दोन गावे पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. याबाबतचा प्रस्ताव सरकारला पाठवण्यात आला आहे. चांदोली राष्ट्रीय उद्यानामध्ये एकूण ३३ गावे होती, त्यापैकी नऊ गावांचे धरणासाठी आधीच पुनर्वसन करण्यात आले आहे.

**मूळ बातमी -** धवल कुलकर्णी. सह्याद्री अभयारण्यांवर आता कॅमेरे आणि ड्रोनची नजर! https://www.loksatta.com/, ०१.०१.२०.

## टिपेश्वर अभयारण्य

### प्रभावी व्यवस्थापन क्रमवारीत टिपेश्वर सहाव्या स्थानी

यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्याने व्यवस्थापनाच्या मूल्यांकनात राज्यातील ११ अभयारण्यांमध्ये सहावा क्रमांक पटकावला आहे. संरक्षित क्षेत्रांच्या २०१८-१९ या वर्षातील व्यवस्थापनाचे मूल्यांकन करणारा अहवाल नुकताच प्रकाशित झाला. त्यामध्ये ही क्रमवारी दिली आहे. १९९८ मध्ये अभयारण्य म्हणून घोषित झालेल्या टिपेश्वरच्या जंगलात आजघडीला १४ वाघ आहेत. या अभयारण्याला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मूल्यांकनाच्या यादीत ठाणे खाडी रोहित वन्यजीव अभयारण्याने सर्वोच्च स्थान मिळवले आहे. त्यापाठोपाठ दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर अनुक्रमे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि पुणे जिल्हयातील मयुरेश्वर सुपे अभयारण्य ही क्षेत्रे आहेत.

मूल्यांकनाची ही प्रक्रिया केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी राबवली जाते.

**मूळ बातमी** – टिपेश्वर अभयारण्याची पत उंचावली, महाराष्ट्रातील ११ पैकी लागतो हा क्रमांक. https://www.esakal.com/, २७.०२.२०२०.

### हद्दवाढ विचाराधीन; लगतच्या गावांमध्ये वाघाची भीती

टिपेश्वर अभयारण्यातील वाघांची वाढती संख्या लक्षात घेता १४८ चौरस किमी क्षेत्रफळावर पसरलेल्या या अभयारण्याचे कार्यक्षेत्र वाढवण्याचा वन विभागाचा मानस आहे. त्यासाठीचा प्रस्ताव वन्यजीव विभागाच्या विचाराधीन आहे. पारवा वन परिक्षेत्रातील पारवा, कुर्ली, किन्ही या गावांचे क्षेत्र अभयारण्यात समाविष्ट केला जाईल, अशी शक्यता आहे. त्या बरोबरच, इतर आणखी काही गावे अभयारण्याला जोडता येतील का याबाबत चाचपणी सुरू आहे. गावे अभयारण्यात समाविष्ट केली तर तिथल्या रहिवाशांना मोबदला, त्यांचे पुनर्वसन या मुद्द्यांवर विचारविनिमय केला जात आहे.

टिपेश्वरलगतच्या सुन्ना गावात बैलावर वाघिणीने हल्ला करून त्याला ठार केले. आजूबाजूला शेतमजूर काम करत असताना वाघाने हल्ला केला, त्यामुळे शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीती असून पाचेक दिवस शेतीची कामे ठप्प झाली. सुन्नासह बल्लारपूर, कवठा, बोथ, बहात्तर, टेंभी, वांजरी, अंधारवाडी, कोबई, कोपामांडवी, टाकळी, कारेगाव, अर्ली, पिंपळशेंडे, वळवाट, धरमगोटा, हिवरी, पिटापुंगरी, दर्यापूर इत्यादी गावांना वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.


टिपेश्वर अभयारण्य पूर्वी पेंच व्याघ्र प्रकल्पात समाविष्ट होते. मात्र, आता त्याचा समावेश मेळघाट व्याघ्र प्रकल्पात केला जाणार आहे. दरम्यान, या अभयारण्याला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देण्याला राज्याचे वन मंत्री संजय राठोड यांनी तत्त्वतः मंजुरी दिली आहे.

गेल्या वर्षीच्या गणनेनुसार, टिपेश्वरमध्ये सध्या बछड्यांसह १८ वाघ आहेत.

**मूळ बातमी** – 'टिपेश्वर'च्या हद्दवाढीचा प्रस्ताव. https://www.lokmat.com/, २९.०२.२०.
नरेश मानकर. सुन्ना ढोकी परिसरातील शेतीकामे ठप्प. https://www.lokmat.com/ ०३.०३.२०.

## टिपेश्वर अभयारण्य/ज्ञानगंगा अभयारण्य

### पाच महिन्यांत वाघाचा टिपेश्वर ते ज्ञानगंगा प्रवास




यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यातील 'टी१सी१' हा नर वाघ बुलडाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्यात दिसून आला. जून २०१९ पासून पाच महिन्यांत या वाघाने दोन अभयारण्यांमधील एक हजार ३०० किलोमीटर अंतर पार केले. दोन राज्यांतील सहा जिल्ह्यांमधील शेकडो गावे ओलांडून टी१सी१ने हा प्रवास केला. या प्रवासात त्याने गुरेढोरे मारली, मात्र माणसांवर हल्ला केल्याचे वृत्त नाही.

टिपेश्वर अभयारण्यातील 'टी१' या वाघिणीला जून २०१६ मध्ये जन्मलेल्या 'टी१सी१'सह 'टी१सी२' व 'टी१सी३' असे तीन बछडे आहेत. हे तिन्ही बछडे २०१९च्या सुरुवातीला तिच्यापासून वेगळे झाले. आईपासून विभक्त होऊन नवीन क्षेत्राच्या शोधात असलेल्या वाघांच्या वर्तणुकीचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने या बछड्यांना मार्च २०१९ मध्ये रेडिओ कॉलर लावण्यात आल्या होत्या. रेडिओ कॉलरच्या साह्याने वाघांच्या हालचालींवर दूरवरून लक्ष ठेवता येते. 'भारतीय वन्यजीव संस्थे'चे डॉ. पराग निगम आणि डॉ. बिलाल हबीब यांच्या नेतृत्त्वाखाली हा अभ्यास केला जात आहे.

जून २०१९ मध्ये तीन वर्षे वयाचा टी१-सी१ टिपेश्वरमधून बाहेर पडल्याचे दिसून आले. आदिलाबाद उपविभाग, नांदेड उपविभाग, किनवट, अंबाडी घाट असा प्रवास करून ऑगस्ट-सप्टेंबरदरम्यान तो पैनगंगा अभयारण्यात गेला. ऑक्टोबरमध्ये तिथून बाहेर पडून तो पुसद उपविभागातील ईसापूर अभयारण्यात गेला. ऑक्टोबरअखेरीस तो हिंगोली जिल्ह्याात गेल्याचे दिसून आले. नोव्हेंबरच्या सुरुवातीला तो अकोला जिल्ह्यात आणि नोव्हेंबरच्या अखेरीस तो बुलडाणा जिल्ह्यात दाखल झाला. चिखली आणि खामगावजवळ आल्यानंतर एक डिसेंबरला टी१सी१ने ज्ञानगंगा अभयारण्यात प्रवेश केला. आता तो मेळघाट अभयारण्यापासून ५० किलोमीटर अंतरावर आहे.

यापूर्वी, २०१६ मध्ये टिपेश्वरमधील आईपासून वेगळा झालेला आणखी एक वाघ जानेवारी २०१९ मध्ये कावल व्याघ्र प्रकल्पात दिसून आला होता.

दरम्यान, टी१सी३ जुलै २०१९ मध्ये तेलंगणमधील आदिलाबाद शहराच्या जवळ गेला होता. मात्र, तो दहा दिवसांतच टिपेश्वरला परत आला आणि तिथेच राहिला. टी१सी२नेही बरेच अंतर पार केल्याचे वृत्त आहे.

**मूळ बातम्या** - टिपेश्वर अभयारण्यातील 'टी१-सी१' वाघाची सफर, https://www.loksatta.com/, ०२.१२.१९.

टिपेश्वर अभयारण्यातील वाघ पोहोचला बुलडाण्यात. https://www.lokmat.com/, ०२.१२.१९.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### अतिक्रमणाबाबत हमीपत्राच्या अटीला विरोध

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात नवे मार्गदर्शक (गाईड) नियुक्त करण्यासाठी लागू केलेल्या हमीपत्राच्या अटीला महाराष्ट्र राज्य अभयारण्य गाईड्स युनियनने विरोध केला आहे. ही अट मागे घेण्याची मागणी या संघटनेने केली आहे.

नव्या मार्गदर्शकांची नियुक्ती करण्याच्या हेतूने संघटनेने विविध सूचना केल्या होत्या. त्यामध्ये मराठी व हिंदी भाषांमध्ये चांगले संवादकौशल्य, इंग्रजीचे जुजबी ज्ञान, वयाची २१ वर्षे पूर्ण, वन गुन्हा किंवा वन कायद्याचे उल्लंघन केलेले नसावे यांचा समावेश होता. त्यात प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांनी आणखी एक अट लागू केली. मार्गदर्शक, वाहनचालक व मालक आणि त्यांच्या कुटुंबियांनी कोणत्याही शासकीय व वन जमिनीवर अतिक्रमण केले नसल्याचे हमीपत्र २०० रुपयांच्या मुद्रांकावर लिहून द्यावे, अशी ही अट आहे.

बहुसंख्य मार्गदर्शक, वाहनचालक व मालक हे आदिवासी नसल्यामुळे त्यांना वनाधिकार कायदा २००६ अंतर्गत हक्क मिळणे शक्य नाही. मात्र, हे पूर्वीपासूनच इथले स्थानिक रहिवासी आहेत, अशी भूमिका घेत संघटनेने या अटीला विरोध केला आहे.

**मूळ बातमी** – गाईड व्हायचे असेल तर हे आलेच पाहिजे...आता आणखीच काहीतरी नवे!

https://www.esakal.com/, २६.०२.२०.

**ताडोबातून गोरेवाड्यात नेलेला बछडा आजारी**

चंद्रपूर इथल्या तात्पुरत्या उपचार केंद्रातून गोरेवाडा बचाव केंद्रात आणलेल्या वाघाची प्रकृती खालावली आहे. सुदृढ स्थितीत असलेल्या वाघाची प्रकृती अचानक बिघडल्याने गोरेवाडा प्रशासनाच्या बचाव केंद्रातील वन्यप्राण्यांच्या देखभालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातून आईपासून दुरावलेला वाघाचा बछडा वन कर्मचाऱ्यांना दिसला. मरणासन्न अवस्थेतील या बछडय़ाला ट्रान्झिट ट्रीटमेंट केंद्रातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी योग्य उपाययोजना करून वाचवले. मात्र, तो जंगलात सोडण्यायोग्य नसल्याने त्याला गोरेवाड्यात ठेवण्याचा निर्णय झाला. पण, गोरेवाड्यात आणल्यानंतर त्याला संसर्गजन्य आजार झाला आहे. गोरेवाडा प्रशासनाच्या विरोधात तीन दिवस तिथले कर्मचारी संपावर होते. या काळात बचाव केंद्रातील वन्यप्राण्यांचे प्रचंड हाल झाले. त्यातच हा वाघ आजारी पडला आहे. या बछडय़ाचे पोट फुगायला लागले आहे. त्यामुळे आता गोरेवाडा प्रशासनासमोर या बछडय़ाला वाचवण्याचे आव्हान आहे.

**मूळ बातमी** - ताडोबातून गोरेवाड्यात आलेल्या वाघाची प्रकृती खालावली.
https://www.loksatta.com/, १०.०१.२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प/उमरेड कऱ्हांडला अभयारण्य

**ताडोबातील वाघ ८० किलोमीटरचा प्रवास करून उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात**

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघाने सुमारे ८० किलोमीटरचे अंतर पार करत उमरेड कऱ्हांडला अभयारण्य गाठले आहे. या व्याघ्र प्रकल्पातून आतापर्यंत तीन ते चार वाघांनी उमरेड-कऱ्हांडलामध्ये प्रवेश केल्यामुळे ताडोबा ते उमरेड हे वाघांसाठी एक संरक्षित क्षेत्र म्हणून समोर येत आहे. उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात एका वन्यजीवप्रेमीने एका वाघाचे छायाचित्र काढले. या वाघाला पाहताक्षणी ताडोबातील ‘माया’ या वाघिणीच्या बछड्याशी साम्य असल्याचे लक्षात आले. ताडोबातील छायाचित्राशी ते ताडून पाहता हा तोच वाघ असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, वन खात्याकडून यावर अधिकृतरित्या शिक्कामोर्तब व्हायचे आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातून गेल्या वर्षी दोन वाघ स्थलांतरित झाले होते. यावर्षी कोळसा वनक्षेत्रातून दोन वाघ स्थलांतरित झाले आहेत. खडसंगी बफर क्षेत्रातून एका वाघाचे स्थलांतर झाले आहे. विशेष म्हणजे, अतिशय कमी कालावधीत हे वाघ स्थलांतरित झाले आहेत. कोळसा वनक्षेत्रातून वाघ सातत्याने बाहेर पडत आहेत. उमरेड-कऱ्हांडला अभयारण्यात जाण्यासाठी वाघांनी चिमूर, भिसी, घोडाझरी असा मार्ग वापरला आहे. या अभयारण्यात आलेल्या काही वाघांनी काही कालावधीनंतर नवेगाव-नागझिरा व इतर अभयारण्यांचा मार्ग धरला.

**मूळ बातमी** - सुरक्षेसाठी ताडोबातील वाघांचे स्थलांतर.
https://www.loksatta.com/, २१.१२.१९.

## तुंगारेश्वर अभयारण्य

**अभयारण्यात वेगाने दुचाकी चालवणाऱ्या दहा जणांना अटक; दोघांचा शोध सुरू**

तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्याच्या प्रतिबंधित क्षेत्रात धुमाकूळ घातल्याप्रकरणी वन विभागाने आणखी चार दुचाकीस्वारांना अटक केली आणि तूर्तास जामिनावर सोडले. आत्तापर्यंत या प्रकरणी दहा जणांना अटक करून जामिनावर सोडले असून, अन्य दोन दुचाकीस्वारांचा तपास सुरू आहे.

तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यात तुंगारेश्वर मंदिराच्या मागील रस्त्यावर ९ फेब्रुवारीला काही दुचाकीस्वारांनी बेदरकारपणे दुचाकी चालवल्या होत्या. सुमारे दोन ते तीन तास हा धुमाकूळ सुरू होता. त्याचे चित्रीकरण एका पर्यावरणप्रेमीने केल्यामुळे ही घटना समोर आली.

वन विभागाने छायाचित्रांच्या आधारे दहा दुचाकीस्वारांचा शोध लावला असून त्यांना अटक करून जामिनावर सोडले. जामिनावर असलेल्या सर्व १० दुचाकीस्वारांना न्यायालयात आरोपपत्र दाखल होईपर्यंत दर गुरुवारी वन विभागाच्या कार्यालयात हजर राहणे बंधनकारक आहे. वन्यजीव अभयारण्यात ताशी २० किमीपेक्षा अधिक वेगाने वाहन चालवण्यास मनाईच्या न्यायालयाच्या आदेशाचा अवमान आणि अभयारण्यात बेकायदा प्रवेश करणे या कलमांखाली त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त सहा महिन्याचा तुरुंगवास आणि पाच हजार रुपये दंडाची तरतूद असल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

**मूळ बातमी** – तुंगारेश्वरमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या आणखी चार दुचाकीस्वारांना अटक.
https://www.loksatta.com/, ०३.०३.२०.

## मुंबईनजीकच्या जंगलांना हवामान बदलापेक्षा मानवनिर्मित वणव्यांचा धोका जास्त

ऑस्ट्रेलियामध्ये लागलेल्या वणव्यांच्या पार्श्वभूमीवर मुंबईनजीकच्या जंगलांबद्दल चिंता निर्माण झाली आहे. मात्र इथे नैसर्गिक वणव्यांपेक्षा मानवी गैरकृत्यांमुळे लागणाऱ्या आगींचा धोका जास्त आहे.

फेब्रुवारी ते मे हा काळ आगींच्या दृष्टीने संवेदनशील आहे. ऑस्ट्रेलियातील झाडांच्या प्रकारांमुळे तिथे नैसर्गिक वणवे भडकताना दिसतात. मात्र मुंबई आणि परिसरात असे वणवे लागणार नाहीत, अशी ग्वाही अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (पश्चिम) यांनी दिली आहे. मुंबई, पालघर, तुंगारेश्वर परिसरात १५ जानेवारी ते १५ जुलै या काळात सतत देखरेख सुरू असते, असे त्यांनी सांगितले. या परिसरात १०० ब्लोअर (हवेच्या झोताचा वापर करून आगीवर नियंत्रण आणण्यासाठी वापरले जाणारे यंत्र) आहेत. तसेच कर्मचाऱ्यांकडे खास पोशाखही आहेत. या तंत्रज्ञानाचा फायदा होत आहे, असेही ते म्हणाले.

दारूच्या भट्ट्या, जंगलात एखादा प्राणी भाजून खाणे अशा कारणांमुळे आगी लागल्याची उदाहरणे आहेत. १९२६ या क्रमांकावर संपर्क साधून आगीची माहिती दिल्यास घटनास्थळी कर्मचारी पोहोचतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, 'येऊर एन्व्हायर्नमेंटल सोसायटी'ने ३० मार्च, २०१६ रोजी येऊरमध्ये मानवनिर्मित वणव्यांबद्दल लेखी तक्रार केल्याची माहिती दिली. येऊर परिसरातील अनेक अवैध उद्योगांमुळे जंगलाला आगी लागतात, मात्र यांबाबत कठोर कारवाई होत नाही. तसेच आग लावून जंगल साफ करायचे आणि मग तिथे अवैध बांधकामे करायची ही पद्धतसुद्धा या आगींमागचे एक कारण आहे, असे या संस्थेने म्हटले आहे.

महाराष्ट्रातील एकूण जंगलांपैकी ३.४० टक्के वनक्षेत्र आग लागण्याची जवळपास खात्रीच असल्यामुळे धोकादायक मानल्या गेलेल्या क्षेत्रात येते. त्या खालोखाल अतितीव्र अग्नीप्रवण जंगल हे ४.०१ टक्के तर तीव्र अग्नीप्रवण जंगलाचे प्रमाण १५.६० टक्के आहे. राज्यातील कमी अग्नीप्रवण जंगलांचे प्रमाण ६०.३४ टक्के आहे, अशी माहिती भारताच्या वन सर्वेक्षण अहवालातून समोर आली आहे.

**मूळ बातमी** - जंगलांना धोका मानवनिर्मित आगींचा. https://maharashtratimes.indiatimes.com/, ०४.०१.२०.

संरक्षित क्षेत्र वार्तापत्र ई-मेलद्वारे हवे असल्यास संपर्कः
marathipaupdate@gmail.com

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### कोका अभयारण्यातून रात्रीची वाहतूक बंद

कोका अभयारण्यातून जाणारे रस्ते सायंकाळी सहा ते पहाटे सहा वाजेपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश भंडारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. मात्र, यामुळे अवैध धंद्यांवर मर्यादा येत असल्याने हे मार्ग पुन्हा सुरू करण्यासाठी अभयारण्य व जिल्हा प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात हे अभयारण्य आहे. या अभयारण्यात वाघ, वाघीण आणि तीन बछडे तसेच बिबट्या, अस्वल व इतर प्राणी आहेत.

कोका अभयारण्यातून भंडारा ते करडी (पलाडी मार्गे) हा १२ किलोमीटरचा रस्ता, भंडारा ते करडी (सालेहेटी मार्गे) हा १.५४ किलोमीटरचा आणि तुमसर-साकोली हा सहा किलोमीटरचा रस्ता जातो. हे तिन्ही रस्ते वर्दळीचे असल्याने वन्यजीवांच्या भ्रमंतीला अडथळा निर्माण होत होता म्हणून अभयारण्य प्रशासनाने भंडारा जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठवून हे तिन्ही रस्ते रात्रीच्या वेळी बंद करण्याची विनंती केली. जिल्हाधिकाऱ्यांनी पर्यायी मार्गाने वाहतूक वळवून हे तिन्ही रस्ते सायंकाळी सहा ते सकाळी सहा वाजेपर्यंत बंद केले. यातून स्थानिक गावकरी, रुग्णवाहिका व अग्निशमन दलाची वाहने यांनाही सवलत देण्यात आली आहे.

रात्रीच्या वेळेत या मार्गांवरून अवैध रेती, गिट्टी, मुरुम भरलेल्या ट्रकची वाहतूक मोठ्या प्रमाणावर होते. तसेच या रस्त्यांचा वापर करुन वैनगंगा नदीतून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होतो. हे रस्ते बंद केल्याने या धंद्यांवरही चाप बसला आहे. तसेच गाभा क्षेत्रातील एका गावातील अवैध ढाब्यावर दारू पिऊन येणाऱ्या व अभयारण्यात घुसखोरी करणाऱ्या पर्यटकांनाही आळा घातला गेला आहे. मात्र, या लोकांनीच राजकीय नेत्यांमार्फत रात्रीची वाहतूक सुरू करण्यासाठी प्रशासनावर दबाव आणण्यास सुरुवात केली आहे.

**मूळ बातमी** – कोका अभयारण्यातील वाहतूक बंदीचे राजकारण. https://www.loksatta.com/, ०८.०२.२०.

### अपुऱ्या लिंगगुणोत्तरामुळे नवेगाव नागझिऱ्यात वाघांच्या संख्यावाढीला मर्यादा

वाघांच्या संख्येचे प्रमाण चांगले असण्यासाठी तीन मादी वाघांमागे एक नर असायला हवा. मात्र, नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात नर वाघांच्या प्रमाणात माद्यांचे प्रमाण कमी

असल्यामुळे वाघांच्या संख्यावाढीला बंधने येत आहेत, असे नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे संचालक आणि मुख्य वन्यजीव संरक्षकांनी सांगितले.

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात पाच नर आणि तीन मादी वाघ आहेत. फेब्रुवारी २०१९ मध्ये टी८ आणि टी९ या दोन नरांमध्ये टी४ या वाघिणीसाठी झालेल्या चढाओढीत टी८ गंभीर जखमी झाला होता.

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प हा भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात पसरला असून त्यात नागझिरा वन्यजीव अभयारण्य, नवेगाव वन्यजीव अभयारण्य, नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि कोका वन्यजीव अभयारण्य यांचा समावेश होतो. या व्याघ्र प्रकल्पाचे महत्त्व असे की हा भाग महाराष्ट्रातील वाघांचे अस्तित्व असलेल्या भागांना जोडणारा दुवा आहे. ताडोबा, पेंच, उमरेड कऱ्हांडला हे व्याघ्र प्रकल्प तथा वन्यजीव अभयारण्य आणि इतर राज्यांतील असे अधिवास, उदाहरणार्थ, छत्तीसगडचा इंद्रावती व्याघ्र प्रकल्प आणि मध्य प्रदेशातील पेंच आणि कान्हा व्याघ्र प्रकल्प या साऱ्या प्रकल्पांना नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प जोडतो.

**मूळ बातमी** - धवल कुलकर्णी. वाघांमध्ये संघर्ष वाढणार, मादींसाठी नरांमध्ये 'टशन'!
https://www.loksatta.com/
०५.०१.२०.

## नांदुरमधमेश्वर अभयारण्य

### नांदुरमधमेश्वर राज्यातील पहिले 'रामसर' स्थळ

नांदुमधमेश्वर वन्यजीव अभयारण्याला 'रामसर' दर्जा प्राप्त झाला असून, हा दर्जा मिळालेली ही राज्यातील पहिली पाणथळ आहे. हा दर्जा मिळविण्यासाठी वन विभाग गेली १० वर्षे प्रयत्नशील होता. नांदुरमधमेश्वरमध्ये २६५ हून अधिक देशी-परदेशी पक्षी आढळतात. 'रामसर' दर्जामुळे या पाणथळीच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्न केले जातील.

पाणथळींच्या संरक्षण, संवर्धनासाठी उपाययोजना करण्याबाबत इराणमधील रामसर शहरात २ फेब्रुवारी १९७१ रोजी चर्चा झाली. या चर्चेचे फलित म्हणून जो ठराव झाला, त्याला 'रामसर ठराव' म्हणतात. रामसर ठराव स्वीकारलेल्या देशांमधील पाणथळींना ठरावाच्या निकषांनुसार 'रामसर' दर्जा दिला जातो.

**मूळ बातमी** – नांदुरमधमेश्वर पक्षी अभयारण्याला 'रामसर'चा दर्जा! राज्यातील हे पहिले ठिकाण!
https://www.esakal.com/,
२६.०१.२०.

### वर्धापनदिनी पक्षीगणनेत १७, ६०७ पक्ष्यांची नोंद

नांदुरमधमेश्वर पक्षी अभयारण्यात ११, ९६१ पाणपक्षी आणि वने, माळरानात राहणारे ५,६५६ अशा एकूण १७ हजार ६०७ पक्ष्यांची नोंद यंदा झाली आहे. २५ फेब्रुवारी रोजी अभयारण्याच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून वन विभागाने पक्षीमित्र, स्थानिक मार्गदर्शक, वन्यजीव अभ्यासक यांच्या मदतीने पक्षीगणना केली. त्यात चापडगाव, मांजरगाव, खानगावथडी, कुरूडगाव, काथरगाव या पाच ठिकाणी पक्षीनिरीक्षण करण्यात आले. तत्पूर्वी, जानेवारी महिन्यात झालेल्या पक्षीगणनेत अभयारण्यात ३४, ४२४ पक्षी दिसून आले होते.

नांदुरमधमेश्वरमध्ये वारकरी, जांभळा बगळा, राखी बगळा, स्पॉट बिल डक, गडवाल, ब्राह्मणी बदक, कापशी बदक, कॉमन पोचार्ड, विजन, लिटल क्रेक, बेलन्स क्रेक, स्पूनबिल, रिव्हर टर्न, नकटा बदक, टफ्टेड पोचार्ड, प्रॅटिन्कोल, कमळपक्षी, शेकाट्या, कॉमन क्रेन आणि मोठ्या संख्येने गुलाबी मैना आढळून आल्या.

यंदा पाऊस चांगला झाल्याने नांदुरमधमेश्वर धरण परिसरात पाणीसाठा मुबलक प्रमाणात आहे. परिणामी हिवाळ्यात मुक्कामी आलेल्या स्थलांतरित पक्ष्यांनी आपला मुक्काम वाढविला आहे.

नांदुरमधमेश्वरच्या धरण परिसरात पक्षी जखमी झाला, मासेमारीच्या जाळ्यात अडकला तर त्याला तातडीने मदत मिळावी यासाठी विशेष होडीची व्यवस्था करण्यात आली आहे.

अभयारण्याच्या शाश्वत विकासासाठी लोकसहभागातून रोजगाराभिमुख पर्यटन विकास आणि ग्रामविकास ही संकल्पना राबविली जात आहे. तसेच वनसंरक्षण आणि वन्यजीव संवर्धन यांमध्ये लोकसहभाग वाढविण्यासाठी, गावांमध्ये मूलभूत सुविधा निर्माण करून वनांवरचे, संरक्षित क्षेत्रावरचे अवलंबित्व कमी करणे तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी वन विभाग प्रयत्नशील आहे.

**मूळ बातम्या** – नांदुरमधमेश्वर अभयारण्यात १७ हजारपेक्षा अधिक पक्ष्यांची नोंद.
https://www.loksatta.com/,
२९.०२.२०.
नांदुरमधमेश्वरमध्ये ३४ हजार पक्षी.
https://www.loksatta.com/,
३१.०१.२०.

**टीप** – बातमीत आलेल्या पक्ष्यांची इंग्रजी व सर्वमान्य शास्त्रीय नावे पुढील तक्त्यात दिल्याप्रमाणे.

(संदर्भः बर्ड्स ऑफ द इंडियन सबकाँटिनेंट, ग्रिमेट-इन्स्किप, २०१६ आणि महाराष्ट्रातील पक्ष्यांची मराठी भाषेतील प्रमाण नावे. संकलनः डॉ. राजू कसंबे, २०१६.)

| बातमीतील नाव | शास्त्रीय नाव |
|---|---|
| वारकरी | *Fulica atra* |
| जांभळा बगळा | *Ardea purpurea* |
| राखी बगळा | *Ardea cinerea* |
| स्पॉट बिल डक | *Anas zonorhyncha* |
| गडवाल | *Anas strepera* |
| ब्राह्मणी बदक | *Tadorna ferruginea* |
| कापशी बदक | *Nettapus cormandelianus* |
| कॉमन पोचार्ड | *Aythya ferina* |
| विजन | *Anas penelope* |
| लिटल क्रेक | *Porzana parva* |
| बेलन्स क्रेक | *Porzana pusilla* |
| स्पूनबिल | *Platalea leucorodia* |
| रिव्हर टर्न | *Sterna aurantia* |
| नकटा बदक | *Sarkidiornis melanotos* |
| टफ्टेड पोचार्ड | *Aythya fuligula* |
| प्रॅटिन्कोल | * |
| कमळपक्षी | * |
| शेकाट्या | *Himantopus himantopus* |
| कॉमन क्रेन | *Grus grus* |
| गुलाबी मैना | *Pastor roseus* |

*एकाहून अधिक जातिंसाठी वापरले जाणारे मराठी नाव. नेमकी जाति ओळखणे प्रत्यक्ष निरीक्षणाशिवाय अशक्य.

### 'रामसर' दर्जामुळे वन विभागाची जबाबदारी वाढली

नांदुरमधमेश्वर अभयारण्याचा पाणथळींच्या रामसर यादीत समावेश झाल्यामुळे एकीकडे पर्यावरणप्रेमी, अभ्यासकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे; तर दुसरीकडे वन विभागासमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत.

अभयारण्याची सीमा चापडगाव, माजलगाव, करंजगाव, थानगावथडी, नांदूरमध्यमेश्वर, चाचडगाव परिसरालगत आहे. अभयारण्याच्या एकूण जमिनीपैकी ३०० हेक्टर क्षेत्रफळावर गाळपेराची जमीन आहे. वन विभागाच्या या जमिनीवर परिसरातील ग्रामस्थांची शेती आहे. रामसर दर्जा मिळाल्यामुळे अभयारण्याच्या सीमेवर संरक्षक भिंत उभारण्याचे ठरेल, त्यावेळी गाळपेराच्या जमिनीचा मुद्दा गंभीर होणार आहे. या जमिनी ताब्यात घेताना शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न वन विभागाला सोडवावा लागणार आहे.

गंगापूर धरणातून आर्वतनाने सोडण्यात येणारे पाणी, गोदावरीचे पाणी धरण परिसरात येते. या ठिकाणी जलप्रदूषण आहे; जलपर्णी वाहून येतात. जखमी पक्ष्यांसाठी उपचार केंद्र तातडीने उभारणे, पक्षी संवर्धन समिती स्थापन करणे, चापडगावातील निसर्ग परिचय केंद्र अभयारण्य परिसरात हलवणे, तसेच, अभयारण्य परिसरात आता परदेशी पर्यटक, पक्षीनिरीक्षक, अभ्यासक येतील. त्यांच्यासाठी आवश्यक मूलभूत सेवा सुविधा उभारणे अशी विविध कामे वन विभागाला करावी लागणार आहेत.

नांदुरमधमेश्वर पाणथळीच्या संवर्धनासाठी व्यवस्थापन आराखडा तयार करून हे प्रश्न सोडविणार असल्याचे, वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

**मूळ बातमी** - चारूशीला कुलकर्णी. नांदुरमधमेश्वर अभयारण्य रामसर यादीत आल्याने वन विभागावर ताण. https://www.loksatta.com/, २९.०१.२०.

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### चौकशीचा ससेमिरा चुकवण्यासाठी सीमेपलीकडे टाकला वाघिणीचा मृतदेह

पेंच व्याघ्र प्रकल्पात टी१९ या वाघिणीच्या मृत्यूप्रकरणी नागपूर जिल्ह्यातील देवलापार इथल्या वनरक्षकाला मध्य प्रदेश वन विभागाने ताब्यात घेतले. चौकशीचा ससेमिरा चुकवण्यासाठी या वनरक्षकाने आपल्या हद्दीतील देवलापार वन परिक्षेत्रात मरण पावलेल्या वाघिणीचा मृतदेह पेंचच्या मध्य प्रदेशातील खवासा भागात नेऊन टाकल्याचा संशय आहे. वाघिणीच्या मृत्यूप्रकरणी या आधी अटक केल्या गेलेल्या एका वनमजुराने चौकशीत ही माहिती दिली. या माहितीची सत्यासत्यता पडताळण्यासाठी नागपूर उपवनसंरक्षकांनी साहाय्यक वनसंरक्षकांना मध्य प्रदेशात पाठवले आहे. तिथे कागदपत्रे पाहून, निश्चित माहिती मिळाल्यानंतर पुढे तपास करण्यात येईल.

देवलापार वन परिक्षेत्रात १० डिसेंबर २०१९ रोजी मृत वाघीण आढळली. तेव्हा, मृत्यूची कारणे, चौकशी यांपासून सुटका करून घेण्याच्या हेतूने संबंधित वनाधिकारी, कर्मचाऱ्यांनी वनमजुराच्या मदतीने बैलगाडीतून रातोरात तिचा मृतदेह मध्य प्रदेशाच्या हद्दीतील शिवनी क्षेत्रातील खवासा इथे नेऊन टाकला. ११ डिसेंबरला वाघिणीचा मृतदेह आढळल्यावर वनाधिकाऱ्यांनी तपास सुरू केला. तेव्हा, त्यांना घटनास्थळी बैलगाडीच्या चाकांच्या खुणा व दोनतीन माणसांच्या पाऊलखुणा दिसून आल्या. आणखी तपासांती संशयितांची नावे समोर आली आणि एका वनमजुराला अटक झाली.

या घटनेमुळे, दोन्ही राज्यांच्या वन विभागांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

**मूळ बातम्या** – वाघिणीच्या मृत्यूचे लवकरच उलगडणार सत्य. https://www.esakal.com/, ०४.०२.२०.
मृत वाघीण महाराष्ट्राची सीमा पार करून मध्य प्रदेशात. https://www.esakal.com/, ०३.०२.२०.

## बोर व्याघ्र प्रकल्प

### वन कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थांचा अभ्यासदौरा

बोर व्याघ्र प्रकल्पाच्या सीमेलगत माणूस-वन्यजीव संघर्ष टाळण्याच्या उद्देशाने सीमेलगतच्या काही ग्रामस्थांसह वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी उमरेड-पवनी-कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पालगतच्या गावांना भेट दिली. माणूस-वन्यजीव संघर्षाला आळा घालण्यासाठी या गावांनी केलेल्या उपाययोजनांची प्रत्यक्ष माहिती त्यांनी घेतली.

या परिसरात ग्राम परिस्थितिविज्ञान विकास समिती अंतर्गत विविध प्रकारची कामे करण्यात आली आहेत. त्यामध्ये मनोरा गावात केलेल्या रेशीम उद्योग, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प, कुऱ्हाडबंदी, घरगुती गॅस सिलेंडर वितरण, सौर कुंपण, सौर कंदील इत्यादी उपाययोजनांचा समावेश आहे. अभ्यासगटाने या गावाला भेट दिली. तसेच, रानवाडी इथे वन्यप्राण्यांसाठी केलेला गवत कुरण प्रकल्पही पाहिला. त्याचबरोबर, उमरेड-पवनी-कऱ्हांडलाच्या वनाधिकाऱ्यांनी या अभ्यासगटाला मार्गदर्शन केले.

उमरेड-पवनी-कऱ्हांडला हा बोर आणि ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांना जोडणारा दुवा आहे. या दोन व्याघ्र प्रकल्पांसह विदर्भातील इतर व्याघ्र प्रकल्पांमुळे एकूणच या भागात वाघांची संख्या वाढते आहे.

**मूळ बातमी** – ३५ व्यक्तींनी घेतले वन्यजीव-मानव संघर्ष टाळण्याचे धडे. https://www.lokmat.com/ ०१.०३.२०.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### सागाच्या दीडदोनशे वृक्षांची बेकायदा तोड

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सिपना वन्यजीव विभागातील जारिदा वनपरिक्षेत्रातील खंडुखेडा वर्तुळात दीडशे ते दोनशे सागाच्या वृक्षांची तस्करी झाली. या तस्करांना स्थानिक रहिवाशांनी मदत केल्याचे चौकशीअंती दिसून आले आहे. सिपना वन्यजीव विभागाने या प्रकरणी मध्य प्रदेशातील बैतुल जिल्ह्यातील आठ आरोपींसह खंडुखेडाच्या एका स्थानिक रहिवाशाला अटक केली. एक जण अद्याप फरार आहे.

परराज्यातील या तस्करांनी स्थानिक रहिवाशांच्या मदतीने पाहणी करून नियोजन करून रात्री वृक्षतोड केली. लाकूड घेऊन जाण्याच्या तयारीसाठी मोटारीने आलेल्या तस्करांचा संशय आल्याने वन कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर पाळत ठेवून त्यांना रंगेहात पकडले.

मेळघाट प्रकल्पाच्या सेमाडोह, जव्हारकुंड क्षेत्रात व हरिसाल वन परिक्षेत्रात बेकायदा वृक्षतोडीचे प्रमाण मोठे आहे. अलीकडेच धाना भागातही सागाचे २३ वृक्ष तोडणाऱ्या तस्करांना वन विभागाने पकडले.

**मूळ बातमी** – मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत कोट्यवधीची वृक्षतोड. https://www.lokmat.com/, ०५.०३.२०.

### 'मालूर फॉरेस्ट' ग्रामस्थांचा पुनर्वसनाला नकार

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रालगत असलेल्या गावांच्या पुनर्वसनाला सुरुवात झाली असून त्याचा भाग म्हणून 'मालूर फॉरेस्ट' या गावाच्या पुनर्वसनाचा ठराव शासनाकडे पाठवण्यात आला होता. मात्र, मालूर फॉरेस्टच्या रहिवाशांनी पुनर्वसनाला नकार दिला आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या सह्या या पुनर्वसनाला होकार म्हणून दिलेल्या नसून केवळ ग्रामसभेला हजेरी लावल्याबद्दल दिल्याचे व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी सांगितले.

ग्रामसभेत काही रहिवाशांनीच पुनर्वसनाच्या ठरावाला मान्यता दिली होती; इतर अनेकांनी विरोध केला होता. मात्र, ग्रामपंचायतीने हा ठराव बहुमताने पारित झाल्याचे सांगून ग्रामसभेला हजेरी म्हणून दिलेल्या सह्यांची प्रत प्रशासनाला दिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. गावातील २२५ रहिवाशांच्या सह्या असलेले, पुनर्वसनाला नकार देणारे निवेदन ग्रामस्थांनी यावेळी प्रकल्प अधिकाऱ्यांना दिले.

पुनर्वसनाची प्रक्रिया ऐच्छिक असून वन विभाग बळजबरी करणार नाही, ज्यांना पुनर्वसन नको असेल त्यांना नरेगाच्या कामावर रोजगार दिला जाईल, असे हरिसाल वनपरिक्षेत्राच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

**मूळ बातमी** – मालूर फॉरेस्टवासियांचा पुनर्वसनास नकार. https://www.lokmat.com/, ३०.११.१९.

## राधानगरी (दाजीपूर) अभयारण्य

### दाजीपूरच्या जंगलात वाघाटीचे दर्शन

दाजीपूरच्या जंगलात एका पर्यटक दाम्पत्याला वाघाटीचे दर्शन झाले. वाघाटी (लेपर्ड कॅट) हे पाळीव मांजराच्या आकाराचे रानमांजर आहे. याचा रंग व अंगावरील ठिपके हे बिबट्यासारखे असतात. बिबट्याची लहान प्रतिकृती असल्यासारखे हे मांजर दिसते.

वाघाटीचा वावर भारतातील पूर्वेकडील राज्ये व ब्रह्मदेश, थायलंड, इंडोनेशिया, जावा, सुमात्रा इत्यादी देशात आहे. कर्नाटक व केरळमधील सह्याद्रीच्या रांगांतही हा प्राणी आढळून येतो. मात्र वाघाटीचे दर्शन दुर्मीळ असते.


**मूळ बातमी** - दाजीपूरच्या जंगलात दुर्मीळ वाघाटीचे दर्शन. https://www.loksatta.com/, १०.०१.२०.

## लोणार अभयारण्य

### लोणार सरोवरावर रोहित पक्ष्याचे दर्शन

उल्कापाताने ५० हजार वर्षांपूर्वी निर्माण झालेल्या लोणार विवरातील सरोवरावर या वर्षी पहिल्यांदाच रोहित (फ्लेमिंगो) पक्षी दिसून आला आहे. पुरातत्त्व विभागाच्या आकांक्षा रॉय चौधरी यांनी २५ नोव्हेंबरला हा पक्षी लोणार विवरावर पाहिला. त्यानंतर 'मी लोणारकर'च्या सदस्य व पक्षी अभ्यासकांनी पाहणी करून पुन्हा एकदा खात्री करून घेतली.

बसाल्ट खडकातील लोणार विवर १७० मीटर खोल आणि ६.५ किलोमीटर परिघाचे आहे. परदेशी पर्यटक, संशोधक इथे अभ्यासासाठी येतात. मात्र, शासनाने या विवराकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने त्यातील सरोवर एखाद्या डबक्यासारखे प्रदूषित होऊ लागले होते. लोणारच्याच काही तरुणांनी दर शनिवार-रविवारी एकत्र येऊन विवराच्या स्वच्छतेसाठी प्रयत्न सुरू केले. हा 'मी लोणारकर' चमू लोणार विवराच्या संवर्धनासाठी गेली तीन वर्षे प्रयत्न करीत आहे.




हे विवर लोणार वन्यजीव अभयारण्यात येत असले; तरी त्याची धुरा प्रादेशिक वन विभागाकडे होती. 'मी लोणारकर'ने त्याचे व्यवस्थापन वन्यजीव विभागाकडे देण्याची मागणी लावून धरली आणि जून २०१९ मध्ये ते तसे सोपवण्यात आले.

रोहित पक्षी विशिष्ट प्रकारचे शेवाळे खातात. त्यामुळे त्यांच्या पिसांना गुलाबी रंगाची छटा येते. चोचीच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे या पक्ष्याला चिखलातून निवडक शेवाळे खाणे सोपे जाते.

**मूळ बातमी** - लोणार सरोवरात प्रथमच रोहित पक्ष्याचे आगमन, https://www.loksatta.com/, २७.११.१९.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### ''मेट्रो कारशेड'साठी आरे हाच पर्याय योग्य'

'मेट्रो कारशेड'साठी पर्यावरणवाद्यांनी सुचविलेले सर्व नऊ पर्याय तांत्रिक, वित्तीय तसेच पर्यावरणीयदृष्ट्या प्रकल्पासाठी अडचणीचे आणि विलंबकारी ठरतील. आरेमधील सध्याच्या कारशेडच्या जागेतील आवश्यक झाडे आधीच तोडली असल्याने त्या जागेवरच कारशेड उभारल्यास हा प्रकल्प निर्धारित वेळेत मार्गी लागेल, असे मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेल्या समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे.

पर्यावरणवाद्यांचा तसेच शिवसेनेचा विरोध डालवून फडणवीस सरकारने आरेमध्येच कारशेड उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी रातोरात दोन हजारांहून अधिक झाडे तोडण्यात आली होती. शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचाही वृक्षतोडीला विरोध होता. त्यामुळे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी दुसऱ्याच दिवशी मेट्रो कारशेडच्या कामाला स्थगिती दिली व पर्यायी जागेचा शोध घेण्यासाठी वित्त विभागाच्या अप्पर मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीत पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव, मुंबई रेल विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानचे मुख्य वन संरक्षक यांचा समावेश होता.

समितीचा अहवाल शासनास बंधनकारक नसून, कारशेडबाबत मुख्यमंत्रीच अंतिम निर्णय घेतील,असे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

**मूळ बातमी** - 'मेट्रो कारशेड'साठी आरेचाच पर्याय रास्त. https://www.loksatta.com/, ३०.०१.२०.

### आरे वसाहतीत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय

आरे वसाहतीतील सुमारे ११४ एकर भूखंडावर पर्यटन विकासाच्या विविध आकर्षक योजना राबविण्याचा विचार राज्य शासनाचा विचार आहे. त्याचाच भाग म्हणून शासनाने इथे सुमारे पाच एकर भूखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभे करण्याचे ठरविले आहे. त्याची संपूर्ण जबाबदारी पर्यटन महामंडळावरच सोपविण्यात येणार असून त्यासाठी ५०० ते ८०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

बँकॉक, जॉर्जिया, दुबई, चीन, दक्षिण कोरिया, दक्षिण आफ्रिका, स्पेन आदी ठिकाणी असलेल्या मस्त्यालयांचा अभ्यास केल्यानंतर प्रामुख्याने बँकॉकमध्ये असलेल्या 'ओशन वर्ल्ड'च्या धर्तीवर मत्स्यालय उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मत्स्यालयाबरोबर व्यापारी संकुल व काही आकर्षक धाडसी क्रीडा प्रकारही या ठिकाणी सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

**मूळ बातमी** – संदीप आचार्य, निशांत सरवणकर. आरे वसाहतीत भव्य मत्स्यालय.
https://www.loksatta.com/, ११.०१.२०.

### येऊर हिल्स परिसरात रात्री क्रिकेट सामन्यांवर बंदी

वन्यजीवांना उपद्रव होत असल्याचे लक्षात घेऊन वन विभागाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर हिल्स भागातील मैदानांवर रात्रीचे क्रिकेट सामने खेळवण्यास बंदी घातली आहे.

येऊर गाव आणि पाटोणपाडा परिसरात तीन मैदाने आहेत. या मैदानांवर रात्रभर चालणाऱ्या क्रिकेट सामन्यांसाठी लावलेले प्रखर उजेडाचे दिवे आणि ध्वनिवर्धक यंत्रणा वन्यजीवांसाठी उपद्रवकारक असल्याच्या तक्रारी पर्यावरणवाद्यांनी केल्या होत्या. त्याची दखल घेत वन विभागाने टर्फ, द पिच आणि गुरुकुल क्रिकेट अकॅडमीला नोटिसा जारी करून रात्रीचे क्रिकेट सामने थांबवण्यास सांगितले आहे. या नियमाचा भंग केल्यास वन संवर्धन कायद्यांतर्गत कडक कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे.

येऊर हिल्स परिसरात आणखी एक घटना घडली. सकाळी फिरायला येणाऱ्या लोकांना इथल्या खुल्या व्यायामशाळेत बिबट्याचे पिल्लू आढळले. ही बाब ताबडतोब वनकर्मचाऱ्यांना कळवण्यात आली आणि वन विभागाने त्या पिल्लाला देखभालीसाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील प्राण्यांच्या रूग्णालयात नेले.

येऊर हिल्स परिसरात येणाऱ्या लोकांवरही वन विभागाची नजर असेल. प्रवेश तिकिटाशिवाय येऊर वनक्षेत्रात आढळणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. सकाळी फिरायला येणाऱ्यांसाठी मासिक प्रवेश तिकीट उपलब्ध असून ते पहाटे पाच ते सकाळी आठ या वेळेपुरते ते मर्यादित आहे. १९५ रुपयांऐवजी आता या तिकीटाचे शुल्क वाढवून २१५ रुपये करण्यात आले आहे.

मासिक प्रवेश तिकीटाची योजना असूनही वन विभागाकडून तिकीटाची तपासणी होत नसल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. दरम्यान, लोकांना नियम पाळण्याच्या सूचना दिल्या असून नियमांची कठोर अंमलबजावणी करणार असल्याचे वनाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

डिसेंबर २०१६ मध्ये केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने येऊर परिसर वन्यजीव आणि पर्यावरणासाठी संवेदनशील घोषित केला. मानवी हस्तक्षेपामुळे या परिसराच्या संरक्षण, संवर्धनात अडथळे येऊ नयेत, यासाठी समितीही नियुक्त करण्यात आली आहे.

**मूळ बातम्या** – बॅन ऑन प्लेइंग क्रिकेट एट नाइट इन येऊर हिल्स ऑफ एसजीएनपी.
https://mumbaimirror.indiatimes.com/, १२.१२.१९.
प्रियांका ढोमसे. टर्न डाऊन साउण्ड एट येऊर ऑर फेस म्युझिकः फॉरेस्ट ऑफिशियल्स टू क्लब्स.
https://www.hindustantimes.com/ १२.१२.१९.

## राज्यव्यापी बातम्या

### जनुकीय चाचणीसाठी महाराष्ट्राचा वन विभाग स्वत:ची प्रयोगशाळा उभारणार

वन्यजीवांची जनुकीय (डीएनए) चाचणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाने बोरीवली इथल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात स्वत:ची प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. अशी प्रयोगशाळा उभारणारा महाराष्ट्राचा वन विभाग देशात पहिला ठरणार आहे. यासाठी आवश्यक तीन कोटी ९६ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून प्रयोगशाळा उभारण्याचे काम सुरू झाले आहे. मुख्य वनसंरक्षकांनी ही माहिती दिली.

माणूस-वन्यजीव संघर्षात विशेषत: जेव्हा माणूस मृत्यूमुखी पडण्याच्या घटना घडतात त्यावेळी त्याला कारणीभूत प्राण्याला ओळखून जेरबंद करणे महत्त्वाचे ठरते. आतापर्यंत अशा वन्यजीवांची ओळख पटवण्यासाठी पायांचे ठसे किंवा शरीरावरील खाणाखुणांचा वापर केला जात होता. मात्र, आता वन्यजीवांची तंतोतंत ओळख पटवण्याकरता जनुकीय चाचणी उपयुक्त ठरते. सध्या जनुकीय चाचणीसाठी घेतलेले नमुने


हैदराबादची प्रयोगशाळा किंवा देहरादूनच्या ‘भारतीय वन्यजीव संस्थे’कडे पाठवले जातात. त्यांचे निष्कर्ष मिळण्याकरता अनेक महिने वाट पाहावी लागते. त्यामुळे, कायद्यातील मार्गदर्शक सूचनांनुसार वन्यजीवाला जेरबंद करण्याचे आदेश काढणे, त्यांची अंमलबजावणी करणे यांमध्ये अडचणी येतात. जनुकीय चाचणीचे परिणाम लवकर मिळावे, याकरता वन विभागाने प्रयोगशाळा उभारणीचा निर्णय घेतला आहे.

**मूळ बातमी** - संजय गांधी उद्यानातील वन्यजीवांची डीएनए चाचणी; महाराष्ट्र ठरणार देशातील पहिले राज्य.
https://www.lokmat.com/, ११.१२.१९.

### ११ वर्षांत चार लाख हेक्टर जंगल भस्मसात

राज्यात मागील ११ वर्षांत ३, ८६, २९४.८०३ हेक्टर जंगल आगीत भस्मसात झाले आहे. तापमानात होणारी वाढ, उन्हाळ्यातील कोरडे तापमान आणि वेगात वाहणारे वारे यामुळे जंगलात आगी पसरण्याचे प्रमाण वाढले आहे.

**राज्यात दहा वर्षांत लागलेल्या आगीबाबतची आकडेवारी**




२०१९ या वर्षांत राज्यात आगीच्या ७,६१८ घटना घडल्या. २०१८च्या तुलनेत हे प्रमाण १० टक्क्यांनी कमी असले तरी अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या वनसर्वेक्षण अहवालानुसार राज्यावरील वणव्याची धोक्याची घंटा कायम असल्याचे स्पष्ट केले आहे. ३६,५६५.६८ हेक्टर जंगल गेल्या एका वर्षात जळले आणि ६६ लाख रुपयांहून अधिक रकमेचे नुकसान झाले. मात्र, आर्थिक नुकसानापेक्षाही पर्यावरणाची होणारी हानी अधिक आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी मिळवलेल्या माहितीत ही आकडेवारी समोर आली आहे.

**मूळ बातमी** – राज्यात चार लाख हेक्टर्स जंगल आगीत खाक.
https://www.loksatta.com/, २९.०२.२०.

**टीप** – या बातमीतील आकडेवारी संरक्षित क्षेत्रापुरती मर्यादित नसून त्यात राज्यातील संपूर्ण वन क्षेत्राचा समावेश आहे.

### वन्य पशुंसाठी पाळीव पशुंचे डॉक्टर; वन विभाग टीकेचा धनी

वन्य पशुंसाठी पाळीव प्राण्यांचे डॉक्टर नेमण्याच्या आदेशामुळे वन्यजीवांविषयी वन विभाग गंभीर आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

राज्यातील संवेदनशील वन्यजीव क्षेत्रात वन्य पशुंचे डॉक्टर नेमण्याच्या निर्णयावर राज्य वन्यजीव मंडळाच्या पाच डिसेंबर २०१८ ला झालेल्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यानुसार सहा मे २०१९ रोजी शासन निर्णय जारी झाला; त्यात वन विभागासाठी दहा पदे निर्माण करण्यात आली. मात्र, जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात संबंधित शासन विभागांनी जारी केलेल्या पत्रकांनी, या पदांवर वन्य पशुंचे डॉक्टर नेमण्याऐवजी पाळीव पशुंच्या डॉक्टरांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब केले आहे.

राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये वन्यजीव विहिरीत, कालव्यात पडण्याचे, सापळ्यात अडकण्याचे प्रकार सातत्याने घडून येत आहेत. अशा स्थितीत कंत्राटी पदांवर असलेल्या वन्य पशुंच्या डॉक्टरांनी मानव-वन्यजीव संघर्षांची अनेक प्रकरणे यशस्वीरीत्या हाताळून वन्यजीवांचा जीव वाचवला आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा करुन घेण्याऐवजी अननुभवी पाळीव पशुंच्या डॉक्टरांची नेमणूक करण्याचा आदेश वन्यप्राण्यांसाठी धोकादायक आहे. त्यामुळे राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयाचे उल्लंघन होत असून मंडळाच्या सदस्यांनीही त्याला हरकत घेतली आहे.
महाराष्ट्रात इतक्या वर्षांनंतर पदभरती होणार असताना वन्य पशुंचे डॉक्टरांची नेमणूक करणे चुकीचे असल्याचे वन्यजीवप्रेमींनी म्हटले आहे.

ही प्रक्रिया त्वरित थांबवावी आणि केवळ तज्ज्ञ वन्य पशुंचे डॉक्टर या पदांवर नेमले जावेत, यासाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नितीन काकोडकर यांना राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्यांनी पत्र दिले आहे.

**मूळ बातमी** - राखी चव्हाण. वन्यजीवांबाबत वनखात्याच्या गांभीर्यावरच प्रश्नचिन्ह.
https://www.loksatta.com/, २७.०२.२०.

## नव्या सर्वेक्षणात ६४ टक्के पाणथळी वगळल्या; सुधारीत नियमावलीचा परिणाम

राष्ट्रीय पाणथळ नकाशात नमूद असलेल्या महाराष्ट्रातील पाणथळ जागांपैकी नवीन सर्वेक्षणात सुमारे ६४ टक्के जागा वगळण्यात आल्या आहेत. अहमदाबाद येथील अंतराळ अनुप्रयोग केंद्राने २०१० मध्ये राज्यातील पाणथळ जागांचे सर्वेक्षण केले होते. त्यावेळी राज्यात ४४ हजार ७१४ पाणथळ जागा होत्या. नवीन सर्वेक्षणात मात्र केवळ १५ हजार ८६५ जागांना पाणथळींचा दर्जा दिला आहे.

तसेच, उच्च न्यायालयात पर्यावरण विभागाने यापूर्वी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात नागपूरसह नंदुरबार व परभणी जिल्ह्यात पाणथळी नसल्याचे सांगितले होते. मात्र, नवीन सर्वेक्षणात नागपूर जिल्ह्यात ५६१, नंदुरबारमध्ये १६४ व परभणी जिल्ह्यात ७८ पाणथळींची नोंद आहे.

२०१७ च्या सुधारीत नियमावलीत मानवनिर्मित जलाशय, सिंचन, पिण्याचे पाणी आणि मनोरंजनासाठी तयार केलेले जलाशय, नद्यांची पात्रे, खार जमिनी, मिठागरे, भातखाचरे आदी जागांना पाणथळ जागांमधून वगळण्यात आले आहे. पर्यावरण विभागाने ३० जानेवारीला मुंबई उच्च न्यायालयात याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले. केंद्र सरकारने २०१० साली पाणथळ जागा व्यवस्थापनाबाबत नियमावली तयार केली. यात नदी, तळी, खाडी, धरणाचे जलाशय, खार जमीन, भातखाचरे, मिठागरे यांनाही पाणथळ जागांचा दर्जा दिला होता.

**मूळ बातमी** – महाराष्ट्रातील पाणथळ जागांपैकी ६४ जागा वगळल्या.
https://www.loksatta.com/, ०६.०२.२०.

## वन्यजीव गुन्ह्यांच्या क्रमवारीत महाराष्ट्र दुसरा

वन्यजीवांबाबत सर्वाधिक गुन्ह्यांच्या संख्येत पश्चिम बंगालपाठोपाठ देशात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. वन्यजीव गुन्हे नियंत्रण संस्थे (डब्ल्यूसीसीबी)ने राज्यांचे वन विभाग आणि पोलिस विभागांकडून गोळा केलेल्या आकडेवारीच्या आधारे ही क्रमवारी लावली आहे. पर्यावरण राज्यमंत्री बाबुल सुप्रियो यांनी सहा डिसेंबर रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहांत वेगवेगळ्या प्रश्नांच्या उत्तरांदाखल ही माहिती दिली.

भारतात गेल्या वर्षी ३८८ वन्यजीवविषयक गुन्ह्यांची नोंद झाली. पैकी ५५ गुन्हे पश्चिम बंगालमध्ये; तर ५० गुन्हे महाराष्ट्रात नोंदवण्यात आले. पश्चिम बंगालमध्ये हत्ती, बिबटे आणि वाघांसंबधी गुन्ह्यांची नोंद झाली. महाराष्ट्रात बिबट्या, वाघ, अस्वल आणि रानडुकरांच्या शिकारीच्या गुन्ह्यांची नोंद झाली. त्या पाठोपाठ सर्वाधिक गुन्ह्यांच्या क्रमवारीत असम (४२), उत्तर प्रदेश (३५), तमिळ नाडू (३२) व मध्य प्रदेश (२९) ही राज्ये आहेत.

डब्ल्यूसीसीबीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते, महाराष्ट्रात बिबट्यांच्या संख्येत झालेली वाढ आणि त्यांचे खाद्याच्या शोधात मानवी वस्त्यांजवळ येणे (पाहाः पान क्रमांक १९) यांमुळे बिबट्यांसंबंधी गुन्ह्यांची संख्या वाढलेली आहे. मात्र, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाचे अतिरिक्त वन (वन्यजीव) महासंचालकांनी सांगितले की पश्चिम बंगाल व महाराष्ट्रात नोंद झालेल्या गुन्ह्यांची मोठी संख्या ही त्या राज्यांमध्ये वन्यजीवविषयक कायद्याच्या चांगल्या अंमलबजावणीची निदर्शक आहे.

**मूळ बातमी** – बद्री चटर्जी. महाराष्ट्र स्टूड सेकंड इन वाइल्डलाइफ क्राइम्स इन इंडिया इन 2018.
https://www.hindustantimes.com/, १०.१२.१९.

## पश्चिम घाटात सापडलेल्या 'बेगोनिया'च्या नव्या जातिला डॉ. मधुकर बाचूळकर यांचे नाव

'बेगोनिया' प्रजातिच्या वनस्पतीची नवी जाति केरळ राज्यातील पश्चिम घाटाच्या भागात सापडली आहे. संशोधक डॉ. मधुकर बाचूळकर यांच्या नावाने ही नवी जाति ओळखली जाणार आहे. 'बेगोनिया बाचुळकरी' असे या नव्या जातिचे नामकरण झाले आहे.

पश्चिम घाटातील बेगोनिया प्रजातींचा अभ्यास करत असताना वनस्पती अभ्यासक डॉ. मकरंद ऐतवडे आणि वनस्पती तज्ञ प्रा. डॉ. एस. आर. यादव यांना केरळमधील निलयमपत्ती, पलक्कड इथे डिसेंबर २०१२ मध्ये बेगोनियाची एक जाति आढळून आली. ही जाति नवीन असूनया विषयी शोधनिबंध न्यूझीलंडमधून प्रकाशित होणाऱ्या 'फायटोटॅक्सा' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात नुकताच प्रसिद्ध झाला.

ही वनस्पती गोळा करण्यासाठी केरळमधील त्रिसूर इथल्या 'भारतीय कृषि अनुसंधान परिषद-राष्ट्रीय पादप अनुवंशिक संसाधन केंद्रा'चे शास्त्रज्ञ डॉ. जोसेफ कट्टुकुनेल यांची मदत झाली. या संशोधनामध्ये डॉ. शरद कांबळे, रोहित माने आणि जगदीश दळवी यांनी सहकार्य केले.

**मूळ बातमी** - बेगोनियाच्या नव्या प्रजातिला डॉ. बाचूळकर यांचे नाव.
https://maharashtratimes.indiatimes.com/, २३.११.१९.

## माणूस-बिबट्या संघर्ष

### अहमदनगर जिल्ह्यात माणूस-बिबट्या संघर्ष तीव्र

अहमदनगर जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये माणूस व पाळीव प्राणी बळी पडण्याचे, जखमी होण्याचे प्रमाण दुपटीहून अधिक वाढले आहे. गेल्या आठ महिन्यांत बिबट्याच्या हल्ल्यात वृद्ध महिलेसह एका लहान मुलाचा मृत्यू झाला; तर ६८३ पाळीव प्राणी ठार झाले आहेत.

एप्रिल ते नोव्हेंबर २०१९ दरम्यान बिबट्यांच्या हल्ल्यात दोघांनी जीव गमावला व १९ जण जखमी झाले. त्यांना एकूण ३५, ८०,००० रुपये व ६८३ पाळीव प्राणी मृत झाले, त्यांच्या मालकांना ४६,२५,६१९ रुपयांची मदत देण्यात आली. तुलनेसाठी गेल्या आठ महिन्यांसह त्या आधीच्या तीन वर्षांची आकडेवारी मनुष्यहानी व पाळीव पशूधनाची हानी दोन चौकटींमध्ये दिली आहे.

मनुष्यहानीची आकडेवारी

| कालावधी | मनुष्यहानी | | भरपाई (रुपये) |
|---|---|---|---|
| | मृत | जखमी | |
| एप्रिल ते नोव्हेंबर २०१९ | २ | १९ | ३५,८०,००० |
| २०१८-१९ | १ | ५ | ७,००,००० |
| २०१७-१८ | ० | ७ | १,०८,००० |
| २०१६-१७ | १ | ७ | ११,००,२६७ |

पाळीव पशूहानीची आकडेवारी

| कालावधी | पाळीव पशू हानी | भरपाई (रुपये) |
|---|---|---|
| एप्रिल ते नोव्हेंबर २०१९ | ६८३ | ४६,२५,६१९ |
| २०१८-१९ | १,०८१ | ७८,९९,००० |
| २०१७-१८ | ४८५ | ३४,००,००० |
| २०१६-१७ | ५६५ | २६,००,८१८ |

जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागात बिबट्यांचा संचार अधिक आहे. त्या तुलनेत दक्षिणेकडील भागात पाटपाण्याची कमतरता असल्याने त्याचा संचार कमी आढळला आहे. दरम्यान, नगर शहराजवळील औरंगाबाद रस्त्यावरील जेऊर, इमामपूर परिसरात बिबट्या दिसल्याच्या तक्रारी वन विभागाकडे आल्या आहेत.

वन विभागाकडून दरवर्षी बुद्ध पौर्णिमेला बिबट्याची गणना केली जाते. मात्र, अहमदनगर जिल्ह्यात यंदा या गणनेत एकाही पाणवठ्यावर बिबट्या आढळला नाही. वनाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार जिल्ह्यात बिबट्यांची संख्या किमान ८०० हून अधिक असावी व गेल्या चार वर्षांत ही संख्या किमान दुपटीने वाढली असावी.

बिबट्या दिसल्यास त्याला उपद्रव न देता, आवाज न करता आपली दिशा बदलावी, केवळ संशय असेल तर मोठ्याने काही आवाज करत निघून जावे, असा सल्ला वनाधिकाऱ्यांनी दिला आहे.

**मूळ बातमी** - मोहनीराज लहाडे. जिल्ह्य़ातील बिबटय़ांच्या संख्येत; उपद्रवातही दुपटीहून अधिक वाढ. https://www.loksatta.com/, २०.१२.१९.

### प्रवरा नदीकाठी शेतात बिबट्याचे बछडे

नगर जिल्ह्यात प्रवरा नदीकाठावरील उक्कलगाव परिसरात एका ऊसाच्या शेतात बिबट्याचे दोन बछडे सापडले. वन विभागाने त्यांना ताब्यात घेतले आहे. हे बछडे दोन महिन्यांचे असावेत, असा अंदाज आहे.

उक्कलगाव, गळनिंब, चांडेवाडी, ममदापूर, मांडवे, कडीत, फत्याबाद, कुरणपूर या गावांमध्ये गेल्या महिन्यापासून बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना ताज्या असतानाच हे बछडे आढळले आहेत.

**मूळ बातमी** – प्रशांत चव्हाण. नगरः ऊसाच्या शेतात आढळले बिबट्याचे दोन बछडे. https://www.tarunbharat.com/, २२.०२.२०.

### सोयगाव शिवारात वासरू मारले

औरंगाबाद जिल्हयातील सोयगाव शिवारात बिबट्याने एका वासराला ठार करून जंगलतांड्याकडे मोर्चा वळवला. वन विभागाने प्रयत्न करूनही बिबट्या पकडला गेला नाही. तेव्हा, वन विभागाने शेतकऱ्यांना सूचना दिल्या की शेतांत एकट्याने जाऊ नये, घुंगुरकाठी वाजवत किंवा मोबाईल मोठ्याने गाणी वाजवावीत आणि विजेरीचा वापर करावा.

**मूळ बातमी** – शेतात एकटे जाऊ नका हो. https://www.esakal.com/, २८.०१.२०.

### बिबट्याच्या हल्ल्यात शेळीत ठार

कोल्हापूर जिल्ह्याच्या भूदरगड तालुक्यातील बेगवडे इथे वनहद्दीजवळ एका शेतात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एक शेळी ठार झाली. नुकसानग्रस्त शेतकऱ्याने वन विभागाकडे भरपाईची मागणी केली आहे.

**मूळ बातमी** – त्रिरत्न. बेगवडेत बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार.
https://www.tarunbharat.com/,
०४.०३.२०.

**पंधरवड्यात बिबट्याचे सात बछडे आढळले**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात सोमठाणे इथे ऊसाच्या शेतात बिबट्याचे तीन बछडे आढळले. वन विभागाच्या सूचनांनुसार ग्रामस्थांनी ऊसतोडणी बंद ठेवली, परिसर निर्मनुष्य केला आणि जवळपासच असलेल्या मादीने ४८ तासांत तिन्ही बछड्यांना सुरक्षित स्थळी नेले.

सिन्नर तालुक्यात तीन दिवसांत घडलेली ही दुसरी; तर पंधरवड्यातील तिसरी घटना आहे. यापूर्वी चोंढी इथे दिसून आलेला एक बछडा मादीने काही वेळात सुरक्षित स्थळी नेला. तत्पूर्वी, जानेवारीअखेरीस पळसे शिवारात आढळलेल्या तीन बछड्यांपैकी दोघांना नेण्यात मादीला यश आले. मात्र, तिसऱ्या बछड्याला न्यायला ती परतली नाही. या बछड्याची रवानगी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात झाली.

**मूळ बातम्या** – शेवटी आईच ‘ती’... बाळाला कसे सोडू शकते! अखेर ग्रामस्थांनी सोडला सुटकेचा निःश्वास.
https://www.esakal.com/,
१४.०२.२०.
अवघे आठ दिवसांचेच मातृसुख! आई असूनही पोरकेपण...हृदय हेलावणारी कहाणी!
https://www.esakal.com/,
०६.०२.२०.

**बारामती व शिरूर तालुक्यांत एकेक बिबट्या जेरबंद**

बारामती तालुक्यातील कण्हेरी, काटेवाडी परिसरात वन विभागाला अनेक दिवस गुंगारा देणारी बिबट्याची मादी अखेर पकडली गेली. ग्रामस्थ आणि आपात्कालीन पथकाच्या मदतीने लावलेल्या पिंजऱ्यात हा बिबट्या जेरबंद झाला. तसेच, शिरूर तालुक्यातील वाळूकशेत मळा भागात वावर असलेला बिबट्याही वन विभागाच्या पिंजऱ्यात सापडला आहे.

बारामती तालुक्यातील कण्हेरी इथे शेतात पाच कॅमेरे लावण्यात आले होते व या भागात तीन पिंजरे ठेवण्यात आले होते. त्यातील एकात बिबट्याची मादी अडकली. काटेवाडी, कण्हेरी परिसरात १६-१७ जनावरे बिबट्याने ठार केली होती. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीती होती.

वाळूकशेत मळा भागातही गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर होता. या भागात पिंजरा लावण्याची मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला.

**मूळ बातमी** – बारामती, शिरूर तालुक्यांत बिबट्या जेरबंद.
https://www.loksatta.com/,
१४.०२.२०.

**कुक्कुटपालन केंद्रात घुसून बिबट्याचा हल्ला**

कुक्कुटपालन केंद्रामध्ये घुसून दोन दिवसांच्या अंतरात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शेकडो कोंबड्या मृत्युमुखी पडल्या व तितक्याच जखमी झाल्या.

जुन्नरच्या आणे भागातील कुक्कुटपालन केंद्रात एका बाजूला भिंत असून दोन बाजूने जाळी आहे. छताच्या बाजूला सिमेंटचे पत्रे आहेत. ते उचकटून बिबट्या कुक्कुटपालन केंद्रात शिरला. त्यामुळे कोंबड्यांनी घाबरून मोठ्या प्रमाणात आवाज केला. तो ऐकून कामगार धावून गेला, मात्र, बिबट्याला पाहून तोही घाबरला. बिबट्या एकामागोमाग एक कोंबड्या मारत होता. धाडस एकवटून कामगाराने बिबट्याला हुसकावण्याचा प्रयत्न केला. तेव्हा बिबट्या त्याच्या अंगावर धावून गेला. तो हल्ला कामगाराने चुकवला.

या घटनेच्या दोन दिवस अगोदर बिबट्याने अशाच प्रकारे हल्ला केला होता.

**मूळ बातमी** – जुन्नरला कुक्कुटपालन केंद्रात घुसून बिबट्याचा धुमाकूळ.
https://www.loksatta.com/,
२२.०१.२०.

**स्नानगृहात अडकलेल्या बिबट्याची सुटका**

भंडारा जिल्ह्यात अर्जुनी-मोरगाव तालुक्यातील बाक्टी इथे स्नानगृहात अडकलेल्या बिबट्याची पाच तासांनंतर सुटका करण्यात आली.

तालुक्यात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्यांचा वावर वाढला आहे. काही दिवसांपूर्वी नवेगावबांध इथे एका घरातून बिबट्याला जेरबंद करून जंगलात सोडण्यात आले होते. त्यापाठोपाठ बाक्टी इथे ही घटना घडली. वन विभागाला घटनेची माहिती मिळताच विभागाच्या बचाव पथकाने बाक्टीकडे धाव घेत बिबट्याला पकडण्यासाठी प्रयत्न सुरू केले. तब्बल पाच तासांनंतर बिबट्याला जेरबंद करण्यात यश आले.

**मूळ बातमी** - स्नानगृहात अडकलेल्या बिबट्याची ५ तासांनंतर सुटका, बिबट्यांचा वावर वाढल्यामुळे नागरिक भयभीत.
https://divyamarathi.bhaskar.com/,
०८.०१.२०.

## अनुसूचित वन्यजीवांविषयी बातम्या

### जगभरात खवले मांजरांची संख्या घटली; भारतात तस्करीचे मोठे प्रमाण

जगभरात खवले मांजरांची संख्या झपाट्याने कमी होत असून ५० ते ८० टक्क्यांनी या वर्गाची संख्या घसरली आहे. चीन आणि दक्षिण-पूर्व आशियाई देशात खवले मांजराच्या मांसाला अधिक मागणी आहे. तसेच पारंपरिक चिनी औषधांसाठीही त्याचा वापर होत असल्याने त्यांच्या शिकारीचे प्रमाण वाढले आहे.

खवले मांजराच्या संरक्षण, संवर्धनासाठी वाईल्डलाईफ कन्झर्वेशन ट्रस्ट आणि मध्यप्रदेश वन विभागाने एक योजना सुरू केली आहे. त्याचा भाग म्हणून अलीकडेच त्यांनी दोन भारतीय खवले मांजरांना जंगलात सोडले. तसेच नवव्या जागतिक खवले मांजर दिनाचे औचित्य साधून मध्यप्रदेश वन विभागाने सातपुडा व्याघ्र प्रकल्पात भारतीय खवले मांजराला यशस्वीरित्या रेडिओ-अंकन केले आहे.

नऊपेक्षा अधिक राज्यांतून शिकारी आणि तस्करांना अटक करून यशस्वीरित्या खवले मांजराची सुटका केली आहे. तसेच दोन खवले मांजरांचे यशस्वीरित्या पुनर्वसन केले असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांच्यावर लक्ष ठेवले जात आहे, असे वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

भारतात वन्यजीवांच्या तस्करीत सर्वात जास्त प्रमाण खवले मांजराच्या तस्करीचे आहे. एकूण आठपैकी दोन जातिंची भारतीय आणि चिनी - खवले मांजरे भारतात आढळतात. भारतासह श्रीलंका, बांगलादेश आणि पाकिस्तानात भारतीय खवले मांजराच्या अस्तित्त्वाची नोंद झाली आहे.

**मूळ बातमी** – शिकारीमुळे खवले मांजरांची ८० टक्के संख्या कमी.
https://www.loksatta.com/, १५.०२.२०.

### वाघापेक्षाही खवले मांजराच्या तस्करीचे प्रमाण जास्त

वाघापेक्षाही पँगोलीन अर्थात खवले मांजराच्या शिकारी आणि तस्करीचे प्रमाण जास्त आहे, असे वनाधिकारी आणि वन्यजीवविषयक गुन्ह्यांची उकल करणाऱ्या यंत्रणांचे मत आहे. खवले मांजराच्या खवल्यांना चीन, व्हिएतनाम आणि इतरही काही देशांमध्ये मागणी आहे. खवले मांजर महाराष्ट्रात जवळजवळ सर्वत्र आढळत असल्यामुळे इथून त्याची तस्करी मोठ्या प्रमाणावर होत असावी असा अंदाज आहे.

कोल्हापूर वनवृत्ताच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की कोल्हापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही टोळ्या खवले मांजर, मांडूळ साप, कासव, घुबड यांसारख्या वन्यप्राण्यांची तस्करी करतात. गगनबावडा इथे खवले मांजराची विक्री होणार आहे, अशी माहिती, डिसेंबर २०१९ मध्ये इथल्या फिरत्या पथकाला मिळाली होती. पथकाने सापळा रचून तिथे छापा टाकला आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोघे आणि सांगलीतील एकाला अटक केली. त्यांच्याकडील खवले मांजर जप्त केले. हे खवले मांजर साधारणपणे दीड मीटर लांब आणि दहा किलो वजनाचे होते.

सिंधुदुर्गातील दोघांकडून सांगली जिल्ह्यातील इसम हा प्राणी विकत घेऊन पुढे त्याची विक्री करणार होता. खरेदीदाराशी तो व्हाट्सएपवरून संपर्कात होता. मात्र, या तिघांना अटक झाल्यानंतर त्या माणसाचा फोन बंद आहे. अशा साखळीतील सगळ्या दुव्यांना बऱ्याचदा इतर दुवे कोण कोण आहेत हे ठाऊक नसते. खरेदीविक्रीची प्रक्रिया ही एखाद्या रिले रेस प्रमाणे असते, असे वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत पहिल्या सूचीत - ज्यात वाघाचाही समावेश आहे - खवले मांजराचा समावेश आहे.

**मूळ बातमी** - धवल कुलकर्णी. खवल्या मांजराच्या तस्करीत आणि शिकारीच्या प्रमाणात मोठी वाढ.
https://www.loksatta.com/, ०९.०१.२०.

### भरवस्तीत खवले मांजर

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात आन्वा इथे खवले मांजर दिसून आले. दोनतीन दिवसांपासून परिसरात वावरणाऱ्या खवले मांजराला पाहून ग्रामस्थांमध्ये सुरुवातीला भीती आणि मग, ते निरुपद्रवी आहे हे कळल्यानंतर आश्चर्य पसरले. वन विभागाने बस स्थानकाजवळील झोपडपट्टीतील एका घराच्या पायरीखालून त्याला प्रयत्नांती ताब्यात घेतले.

**मूळ बातमी** – विचित्र दिसणाऱ्या प्राण्यामुळे भ्याले गाव.
https://www.esakal.com/, ०३.०३.२०.

### खवले मांजर तस्करीप्रकरणी दोनदा जामीन नाकारला

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माडखोल इथे खवले मांजर तस्करी प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या दोन संशयितांना न्यायालयाने दुसऱ्यांदा जामीन नाकारला आहे. याच प्रकरणातील आणखी तीन संशयितांचा पहिला जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. सर्व संशयित २३ जानेवारीपासून न्यायालयीन कोठडीत आहेत.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातून आंबोली रस्त्याने बेळगावकडे खवले मांजराची विक्रीच्या उद्देशाने वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला मिळाली होती. त्या नंतर विभागाने वन विभागासह संयुक्त कारवाई केली. १४ जानेवारीला सावंतवाडी-बेळगाव रस्त्यावरील माडखोल इथे ही कारवाई करण्यात आली. तपासणीसाठी रात्री साडेदहाच्या सुमारास थांबवलेल्या मोटारीत खवले मांजर आढळले होते.

**मूळ बातमी** – परशुराम पाटील. खवले मांजर तस्करीप्रकरणी दुसऱ्यांदा जामीन नाकारला. https://www.tarunbharat.com/, २०.०२.२०.

## चंद्रपूर जिल्ह्यात नदी हुदळ्याचे छायाचित्र काढण्यात यश

चंद्रपूर जिल्ह्यात 'नदी हुदळ्या' (स्मूथ कोटेड ऑटर) चे छायाचित्र काढण्यात अमरावतीच्या वाईल्डलाईफ ॲण्ड एन्व्हायर्नमेंट कन्झर्वेशन सोसायटीच्या सदस्य व वन्यजीव अभ्यासकांना यश आले आहे. लतीश डेकाटे आणि अंकित बाकडे यांनी हे छायाचित्र काढले आहे.

विदर्भातील तापी, वैनगंगा, इंद्रावती अशा मोठ्या नद्यांमध्ये या सस्तन जलचराचे अस्तित्व फार पूर्वी होते. मात्र, अलीकडे नद्या कोरड्या पडल्यामुळे आणि जलप्रदूषणामुळे हा प्राणी दुर्मीळ झाला. अलीकडे विदर्भात कुठेच या प्राण्याची नोंद झाली नाही. या पार्श्वभूमीवर, ही महत्त्वाची नोंद ठरली आहे.

**मूळ बातमी** - दुर्मीळ पाणमांजराची विदर्भातील पहिली नोंद. https://www.loksatta.com/, १२.०२.२०.

## गव्यामुळे पिकांचे नुकसान

कोल्हापूर जिल्ह्यात आजरा तालुक्यात पेरणोली व उत्तूर परिसरात गव्यांच्या कळपांकडून शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पेरणोलीत ऊसाचे पीक; तर उत्तूर भागात मका आणि भाज्या गव्यांचे कळप फस्त करत असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत.

गव्यांना हुसकावून लावण्यासाठी मोठ्या आवाजात गाणी लावणे, शेतात प्रकाशझोत सोडणे, डबे वाजवणे, सौर कुंपण, रात्री जागून पिकाची राखण करणे असे विविध उपाय शेतकरी करत आहेत. परंतु, गवे या उपाययोजनांना दाद देत नसल्याचा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

**मूळ बातम्या** – पेरणोलीत गव्याकडून ऊसाची लावण फस्त. https://www.esakal.com/, २१.०२.२०.
गव्यांना हुसकावण्यासाठी शेतात रात्रभर रेडिओचा वापर. https://www.esakal.com/, ०३.०३.२०.

## चार वन्यजीव तस्करांना अटक; आरोपीकडून घोरपडींसह इतर वन्यप्राणीही जप्त

ठाणे वन विभागाकडून अटक करण्यात आलेल्या वन्यजीव तस्कर प्रकरणी चौकशीत कर्नाटकातील एका आरोपीचे धागेदोरे सापडले. या माहितीच्या आधारे वन विभागाच्या पथकाने बंगळुरू इथून त्या इसमाला अटक केली. त्याच्या घरात तीन घोरपडी, एक पोपट आणि १३ मुनिया सापडल्या. वन्यजीव तस्करीची आणखी मोठी आंतरराष्ट्रीय टोळी या भागात सक्रीय असल्याचा अंदाज आहे.

१० डिसेंबरला ठाणे वन विभागाने कोईबंतूर-एलटीटी या गाडीने आलेल्या एकाला अटक केली होती. त्याच्याकडून वन्यजीव जप्त करण्यात आले. तसेच त्याच्या चौकशीतून मुंबईतील दोघे व हैद्राबादेतील एकाला अटक करण्यात आली. या प्रकरणी आणखी तपास सुरू असल्याचे वन विभागाने म्हटले आहे.

**मूळ बातमी** - वन्यजीव तस्करी; आणखी एक अटकेत. https://maharashtratimes.indiatimes.com/, ०९.०१.२०.

## खाणकामामुळे वाघांच्या संचारमार्गात अडथळा

समृद्धी महामार्गामुळे वन्यप्राण्यांच्या संचाराला बाधा येऊ नये म्हणून समिती आणि त्याच वेळी, समृद्धी महामार्गाला समांतर मार्गावर खाणकामामुळे वाघांचे संचारमार्ग खंडित होत असताना खाणकामाकडे दुर्लक्ष हा वन विभागाचा दुटप्पीपणा वन्यजीवतज्ज्ञांच्या वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाजवळ सर्व्हे क्रमांक ६७ मध्ये संरक्षित जंगलात कक्ष क्रमांक १८९ मध्ये आजनगाव इथे खाणीचे काम सुरू आहे. हा मार्ग वन्यप्राण्यांचा आणि विशेषतः वाघांचा संचारमार्ग आहे. हे खाणकाम समृद्धी महामार्गासाठी नसून ही त्यापूर्वीची खाण आहे. मात्र, वाघांच्या संचारमार्गात असूनही वन विभागाने या खाणीवर आक्षेप घेतला नाही. भारतीय वन्यजीव संस्था विदर्भातील वाघांचे संचारमार्ग आखून दिले असून वन विभागाने या मार्गांत कुठेही वाघांच्या अधिवासाचा ऱ्हास होऊ नये, याची खबरदारी घेणे गरजेचे आहे.

मात्र, ही खाण महसूल विभागाच्या हद्दीत आहे, असे म्हणून वन विभागाने या जबाबदारीतून हात झटकले आहेत.

खाणकाम महसूल विभागाच्या हद्दीत असले तरीही तो वाघांचा संचारमार्ग आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या लक्षात ही बाब आणून देणे ही वन विभागाची जबाबदारी आहे.

**मूळ बातमी** – खाणकामामुळे वाघांच्या संचारमार्गात अडथळा. https://www.loksatta.com/, २३.०२.२०.

**वाघाच्या शस्त्रक्रियेवेळी वन्यजीव कायद्याचे उल्लंघन; शस्त्रक्रियाही अयशस्वी**

गोरेवाडा बचाव केंद्रातील 'साहेबराव' या वाघाला कृत्रिम पाय लावताना वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले आहे.

वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या अनुसूची एकमधील वन्यप्राण्यांवर शस्त्रक्रिया करण्याचे आणि त्यांना हाताळण्याचे अधिकार केवळ पशुवैद्यक अधिकाऱ्यांना आहेत. मात्र, साहेबराव या वाघाला कृत्रिम पाय लावताना प्रशासनाने ही प्रक्रिया त्या एक वर्षासाठी दत्तक घेणाऱ्या डॉ. सुश्रूत बाभूळकर यांच्यावरच सोपवली.

पायाची बोटे गमावलेल्या या वाघाला कृत्रिम पाय बसवण्याच्या डॉ. बाभूळकर यांच्या विनंतीला गोरेवाडा प्रशासनाने लेखी परवानगी दिली. त्यानंतर ही प्रक्रिया पशुवैद्यक अधिकाऱ्यांनी पूर्ण करणे नियमाला धरून झाले असते. त्याऐवजी ही प्रक्रिया परदेशातील पशुवैद्यक डॉ. पीटर, डॉ. बाभूळकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पार पाडली. वन्यप्राण्यावर उपचार होत असताना संबंधित पशुवैद्यक आणि त्यांचे सहाय्यक असे मोजकेच लोक त्याठिकाणी असावेत, असे नियमावलीत आहे. 'साहेबरावा'च्या शस्त्रक्रियेवेळी मात्र गोरेवाड्याच्या तीन पशुवैद्यकांसह डॉ. पीटर, डॉ. बाभूळकर, त्यांचे पाच सहकारी आणि माहितीपट तयार करणारे तिघे जण असे सुमारे १५ जण तिथे होते. शस्त्रक्रिया सुरू असताना भ्रमणध्वनीच्या कॅमेऱ्याचे फ्लॅश, चलचित्रण सुरू होते.

काही वर्षांपूर्वी बछड्याच्या पायात नळी बसवण्याचे, दिल्लीहून विमानाने वाघाचे रक्त आणवून ते महाराजबाग प्राणिसंग्रहालयातील वाघाला देण्यासारखे यशस्वी प्रयोग नागपुरातील याच पशुवैद्यकांनी यशस्वी केले आहेत, याचा विसर गोरेवाडा प्रशासनाला पडला.

अधिसूची एकमधील वन्यप्राणी हाताळत असताना विदेशातील लोकांना माहितीपट तयार करण्याची परवानगी कशी दिली या प्रश्नाच्या उत्तरादाखल वनविकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांनी ही चलचित्रफीत प्रसारमाध्यमांना देणार असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात मात्र, दोन दिवस अगोदर एका संकेतस्थळावर ही चलचित्रफीत प्रसारित करण्यात आली.

दरम्यान, शस्त्रक्रियेनंतर शुद्धीवर आलेल्या साहेबरावाने, कृत्रिम पंजामुळे अवघडलेला पाय दोन तीनदा झटकला आणि त्यात त्याचा कृत्रिम पंजा निघाला. त्यामुळे हा प्रयोग तूर्तास तरी फसला आहे.

**मूळ बातमी** – 'साहेबराव' वाघावरील शस्त्रक्रियेचा प्रसिद्धीसाठी वापर! https://www.loksatta.com/, २२.०१.२०.
साहेबरावाने झटकला पंजा आणि फसला देशातील पहिला प्रयोग.
https://www.esakal.com/, १८.०१.२०.

**वाघाच्या हल्ल्यात तीन जखमी**

भंडारा इथल्या बिनाखी शिवारात वाघाच्या हल्ल्यात तीन जण जखमी झाले आहेत.

तुमसर वनक्षेत्रातील गोंडेखारी गावात वाघ असल्याचे कळताच वन विभागाचे पथक वाघाला पकडण्यासाठी आले. तेव्हा ग्रामस्थांनीही वाघ पाहण्यासाठी गर्दी केली. त्या वेळी वाघाने हल्ला केला. उपस्थितांनी वाघाला पळून लावल्यामुळे हल्ल्यात सापडलेल्या माणसाचा जीव वाचला.

तत्पूर्वी, आठवडाभर आधी, गोंडेखारीत वाघाच्या हल्ल्यात एक जण जखमी झाला होता. त्या वेळी वन विभागाने वाघाला जंगलात पिटाळून लावले होते.

**मूळ बातमी** – वाघाच्या हल्ल्यात तीन इसम जखमी; बिनाखी शिवारातील थरारक घटना; नागरीक भयभीत. https://divyamarathi.bhaskar.com/ २५.०१.२०.

**ब्रह्मपुरीत वाघाची शिकार**

ब्रह्मपुरी वन विभागात वाघाची शिकार करण्यात आली असून त्याचे डोके आणि चारही पंजे धडापासून तोडून नेल्याचे निदर्शनास आले. वाघाच्या शवाजवळ एक गाय मरून पडलेली होती. त्यामुळे पुढील चौकशीसाठी गाय मालक आणि गुराखी यांना ताब्यात घेण्यात आले.

दक्षिण ब्रह्मपुरी वनपरिक्षेत्रातील उपक्षेत्र भुजमध्ये गावातील महिलांनी दिलेल्या माहितीनुसार वाघाचे शव आढळले. गुराख्याकडे चौकशी केली असता त्याने वाघाचे डोके कापल्याची कबुली दिली. पण, त्याच्या म्हणण्यानुसार पंजे आधीच कुणीतरी कापून नेले होते. वाघाच्या तोंडातून दातसुद्धा

काढण्यात आले होते. गाय घरी मेली होती आणि तिचे धड मात्र इथे आणून टाकण्यात आले होते.

हा या वर्षी महाराष्ट्रात झालेला पहिला व्याघ्रमृत्यू. मरण पावलेला वाघ हा साधारणपणे तीन वर्षाचा होता. मात्र, शरीर सडल्यामुळे तो नर होता की मादी हे मात्र कळू शकले नाही.

**मूळ बातमी** - धवल कुलकर्णी. अमानुषतेचा कळस : वाघाला मारून डोके आणि चारही पंजे तोडून नेले. https://www.loksatta.com/, १२.०१.२०.

### बिबटे व अस्वलांची शिकार

चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती इथे आयुध निर्माणीच्या परिसरात दोन बिबटे आणि दोन अस्वलांची शिकार करण्यात आली. आयुध निर्माणी परिसरातील उच्च दाबाच्या वीज वाहिनीवर तारा टाकून ही शिकार झाल्याचे वनाधिकाऱ्यांना प्राथमिक चौकशीत दिसून आले आहे. घटनास्थळावरून शिकारीशी संबंधित काही सामग्रीही ताब्यात घेण्यात आली आहे.

**मूळ बातमी** – चंद्रपूर जिल्ह्यात दोन बिबटे आणि दोन अस्वलांची शिकार; विजेच्या तारा टाकून केली वन्यजीवांची शिकार.

https://divyamarathi.bhaskar.com/ ०२.०२.२०.

## राष्ट्रीय बातम्या

### मुंगसांच्या केसांचे ५३ हजारहून अधिक कुंचले महाराष्ट्रासह इतर राज्यांतून जप्त

मुंगुसांच्या केसांपासून तयार केलेले चित्र रंगवण्याचे ५३ हजारांहून अधिक कुंचले 'वन्यजीव गुन्हे नियंत्रण संस्थे' (डब्ल्यूसीसीबी)ने ऑक्टोबर महिन्यात घातलेल्या धाडींमध्ये महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातून जप्त केले.

उत्तर प्रदेशातील शेरकोट भागात पोलिस आणि राज्य वन विभागाच्या मदतीने १० ठिकाणी घातलेल्या छाप्यांमध्ये मुंगुसांचे ११३ किलोग्रॅम वजनाचे केस आणि अशाच केसांपासून तयार केलेले २४,०६० कुंचले जप्त करण्यात आले. या प्रकरणात २६ जणांना अटक झाली. मुंगसांचे हे केस महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तमिळ नाडू, केरळसह दक्षिण भारतातील इतर भागांतून विकत घेतल्याचे चौकशीअंती उघड झाले.

महाराष्ट्रात विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत असे २९,१६६ कुंचले मिळाले. डब्ल्यूसीसीबीने कुंचले विकत घेतले जातात अशा २२ जागा नेमक्या शोधून पुणे, सावंतवाडीसह मुंबईतील मीरा रोड, गोरेगाव, अंधेरी, लोअर परेल, दादर, डोंबिवली इथे चित्रकलेसह इतर लेखन साहित्य व तत्सम वस्तू विकणाऱ्या दुकानांमधून १५ जणांना अटक केली. या संदर्भात १८ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यातील आठ प्रकरणे मुंबईतील आहेत. मुंबईतून जप्त केलेल्या कुंचल्यांची संख्या १८,९२४ आहे.

सप्टेंबरमध्ये शेरकोट भागातच अशा कारवाईत मुंगुसांचे १४५ किलोग्रॅम वजनाचे केस व १० हजार कुंचले जप्त करण्यात आले होते.

या कारवाया डब्ल्यूसीसीबीच्या देशव्यापी 'क्लीन आर्ट' मोहिमेचा भाग आहेत. त्या अंतर्गत मुंगुसांच्या केसांचा व्यापार रोखण्यासाठी डब्ल्यूसीसीबी केंद्रीय तपास यंत्रणा, महसूल गुप्तचर महासंचलनालय, वन विभाग, टपाल खाते, पोलिस खाते आणि 'वाइल्डलाइफ वेल्फेअर असोसिएशन' ही स्वयंसेवी संस्था यांची मदत घेत आहे.

**मूळ बातम्या** – उत्तर प्रदेशःफर रॅकेट लिंक फाउण्ड इन साऊथ इंडिया.

https://timesofindia.indiatimes.com/, २६.१०.१९.

श्रीनाथ राव. मुंबईः ओवर ट्वेंटी नाइन थाउजण्ड माँगूझ हेअर पेंटब्रशेस सीझ्ड, फिफ्टीन हेल्ड. https://indianexpress.com/, २६.१०.१९.

### भारतात दरवर्षी ७८ हजार घुबडांची हत्या

भारतात दरवर्षी ७८ हजार घुबडांना अंधश्रद्धेपोटी मारले जाते. एका सर्वेक्षणात समोर आले आहे की ५० टक्के नागरिकांना घुबडाविषयी योग्य माहिती नाही, २० टक्के नागरिकांना काहीही माहिती नाही आणि उरलेल्या ३० टक्के नागरिकांमध्ये संभ्रम दिसून आला. पुण्यात झालेल्या जागतिक घुबड परिषदेच्या निमित्ताने परिषदेचे संयोजक आणि 'इला फाऊण्डेशन' या संस्थेचे संस्थापक डॉ. सतीश पांडे यांनी ही आकडेवारी सांगितली.

वेगाने नष्ट होत असलेली माळराने, गावांलगतच्या मोकळ्या जागांवर वाढती अतिक्रमणे, ढोली असलेल्या मोठ्या झाडांची होणारी कत्तल यांमुळे घुबडांचे अधिवास धोक्यात आले आहेत. खेरीज, घुबडांची मोठ्या प्रमाणावर तस्करी होते. मात्र, ही बाबदेखील लोकांना फारशी ठाऊक नाही.

**मूळ बातमी** – अंधश्रद्धेपोटी दरवर्षी ७८ हजार घुबडांची हत्या.

https://www.lokmat.com/ ०१.१२.१९.

NOW AVAILABLE

# The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra

## News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by


Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books

**<u>Contents:</u>**

**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*: Bhimashankar WLS, Bhorgad CR, Bor WLS, Gautala Autramghat WLS, Kolamarka CR, Great Indian Bustard Sanctuary, Gyanganga WLS Jaikwadi Bird Sanctuary, Kalsubai-Harishchandragad WLS, Karnala WLS, Lonar WLS, Mahabaleshwar ESZ, Mahendri Reserve Forest, Mansingdeo WLS, Matheran ESZ, Muniya CR, Nandur Madhmeshwar Bird Sanctuary, Radhanagari WLS, Rehekuri Blackbuck Sanctuary, Sanjay Gandhi NP, Sewri Wetlands, Tansa WLS, Thane Creek WLS, Tipeshwar WLS, Tungareshwar WLS, Umred-Karhandla WLS, Yawal WLS, Melghat TR, Nawegaon-Nagzira TR, Pench TR, Sahyadri TR, Tadoba-Andhari TR, Tigers, General News from Maharashtra




**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra - A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (Shiba Desor); 4) Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

<u>ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line drawings by Ashvini Menon</u>

For copies at 20% discount write to psekhsaria@gmail.com or kvbooks@gmail.com

## श्रद्धांजली

### आमची पारुबाई

१९८७-८८ सालच्या 'पश्चिम घाट बचाओ आंदोलना'मध्ये हिरीरीने भाग घेतलेली आमची बिनीची कार्यकर्ती पारुबाई मोरे हिचे नुकतेच निधन झाले. 'जीवन संस्थे'ने १९८५ च्या सुमारास पवना धरण क्षेत्रात कामाला सुरुवात केली तेव्हापासून पारुबाई कामात सामील झाली. संस्थेचे संस्थापक दिवंगत जगदीश गोडबोले; यांना ती 'भाऊ' म्हणत असे; मावळ-मुळशीतील निवडक ग्रामीण महिला कार्यकर्त्यांना गढवाल भागातील 'चिपको आंदोलना'तील गावे आणि राजस्थानातील 'तरुण भारत संघा'चे पाणी विषयक काम बघायला घेऊन गेले तेव्हाही ती आमच्या सोबत होती. हिमालयात गांजाचे रोपटे बघून लकाकलेले तिचे डोळे अजूनही आठवतात. जीवन संस्थेसोबत आरोग्य सेविकांच्या प्रकल्पात तिने काही वर्षे काम केले. संस्थेचे काम थांबल्यावर आणि हातपाय थकल्यावर पोटाची खळगी भरण्यासाठी दारू काढून विकणाऱ्या पारुबाईची विनोदबुद्धी एकदम भारी होती. पुरेशी दारू पोटात गेल्यावर झरणाऱ्या तिच्या तिखट जिभेचा प्रसाद मला तिच्या इच्छेविरुद्ध दवाखान्यात नेल्यावर मिळत असे. बिचारा डॉक्टरदेखील त्यातून सुटायचा नाही.

कोकणातील रायगड जिल्ह्यातील नागशेत हे पारुबाईचे माहेरचे गाव. कळत्या वयातील पारुबाईला घेऊन तिचे आईवडील कोळशाच्या भट्टीवर मजूर म्हणून पुण्यातील मुळशी तालुक्यातील कोळवण गावात साठेक वर्षांपूर्वी आले आणि तिथेच स्थायिक झाले.

आईकडून सुईणीचे कौशल्य आणि वडलांकडून झाडपाल्याच्या औषधांविषयीच्या माहितीचा खजिना पारुबाईला वारशात मिळाला.

"काशीम आणि आसपासच्या गावांतली बरीच मुलं माझ्या हातची", असे ती अभिमानाने सांगत असे. अडलेली बाई दवाखान्यापेक्षा अनुभवी पारुबाईकडे येणे पसंत करत असे. कोयत्याने वा दगडाने नाळ तोडणाऱ्या पारुबाईने संस्थेमार्फत ससून रुग्णालयातून प्रशिक्षण घेऊन ब्लेड, दोरा वापरण्यास सुरुवात केली.

वडलांकडून मिळालेल्या वारशाचा उपयोग तिने कधी थेट; तर कधी अप्रत्यक्षपणे संवर्धनाच्या कामाला हातभार लावून केला. पारुबाईला स्थानिक वनस्पती व त्यांच्या गुणधर्मांविषयी सखोल माहिती होती. तिच्या परसात तिने काही औषधी वनस्पती हौसेने आणून लावल्या होत्या. पुण्यातील काही औषधी वनस्पतीसंशोधकांना पारुबाई आणि देवू यांनी त्यांच्या संशोधनासाठी स्थानिक वनस्पतींची माहिती देऊन, नमुने गोळा करून देऊन मोलाची मदत केली होती.

तुटपुंज्या उत्पन्नाला आधार देण्यासाठी इतर कातकरी कुटुंबांप्रमाणेच पारूबाई आणि देवू जंगलातून सफेद मुसळी, शतावरी अशा औषधी वनस्पती एका व्यापाऱ्याला अधूनमधून विकत.

पारुबाई ही कातकरी या आदिवासी जमातीची. महाराष्ट्रातील तीन आदिम जमातींपैकी ही एक. भूमिहीनता, व्यसनाधीनता, निरक्षरता, बालविवाह, कर्जबाजारीपणा, वीटभट्टी मालक आणि स्थानिक शेतकऱ्यांकडून शोषण अशा विळख्यात मावळ व मुळशी तालुक्यातील कातकरी सापडलेले दिसतात. वनहक्क कायद्यातील तरतुदी यांना लागू होतात की नाही हे तपासण्याची गरज आहे.

जीवन संस्थेने सुमारे २०० कातकऱ्यांना जातीचे दाखले मिळवून दिले आहेत. कातकरी मुलांसाठी नारी समता मंच या संस्थेच्या मदतीने खेळघर चालवले जाते. निदान मूठभर कातकरी तरुणांना चांगला रोजगार मिळवून, शिकून त्यांचे आयुष्य बदलण्यासाठी उद्युक्त करू शकलो; तर ती पारुबाईसाठी श्रद्धांजली ठरेल.

**- गिरिजा गोडबोले**

ई-मेलः girijag@gmail.com

संरक्षित क्षेत्रे आणि त्यातील कर्मचारी वर्गासाठी

**संरक्षित क्षेत्राचे वार्तापत्र**

मदतीचे आवाहन

संरक्षित क्षेत्राचे हे वार्तापत्र निर्माण करताना वाचकवर्गात महाराष्ट्रातील वन कर्मचारी आणि संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन करणारे अधिकारी हा एक मोठा गट असेल, असे लक्षात घेतले आहे. आजही जिथे इंटरनेट पोहोचलेले नाही, अशा दुर्गम भागात पोहोचावे, हा एक हेतू या वार्तापत्राची छापील आवृत्ती काढण्यामागे आहे. आमच्या यादीत अशा काही व्यक्तींचा समावेश आहे. मात्र, ही यादी आणखी मोठी व्हावी, अशी आमची इच्छा आहे. त्याकरता, ही विनंती!

वाचक हो, तुम्हाला दरवर्षी रु. १५० भरून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रात व त्याच्या अवतीभवती काम करणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी हे वार्तापत्र भेट देता येईल. संरक्षित क्षेत्र/कर्मचारी/अधिकारी किंवा मार्गदर्शक/ग्रामस्थाचे नाव, पत्ता ही माहिती आम्हाला पाठवा. प्रती पोहोचवण्याची जबाबदारी आमची!

संपर्कः संपादकीय पत्ता c/o कल्पवृक्ष किंवा marathipaupdate@gmail.com

# दृष्टीकोन

## लोकांची जैवविविधता नोंदवही वास्तव व अनुभव

'पीपल्स बायोडायवर्सिटी रजिस्टर' (पी.बी.आर.) अर्थात 'लोकांची जैवविविवधता नोंदवही' म्हणजे गावातील लोकांच्या सहभागातून तसेच गावाच्या जैवविविधता समितीमार्फत केले जाणारे गावातील जैवविविधतेचे सर्वेक्षण म्हणजे पीबीआर.

माझ्याकडे पीबीआरसाठी एका जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींचे सर्वेक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी होती. मी कृषी आणि सामाजिक क्षेत्रांशी निगडीत एका संस्थेसाठी स्वयंसेवक म्हणून हे काम करत होतो.

या सर्वेक्षणात प्रामुख्याने समाविष्ट असते ती गावाची इत्थंभूत माहिती. त्यामध्ये गावातील लोकजीवन, पारंपरिक शेती, गावाचा इतिहास, भौगोलिक परिस्थिती, जुन्या धार्मिक परंपरा, उत्सव, प्रेक्षणीय तसेच ऐतिहासिक स्थळे, गावातील देवराईत आढळणाऱ्या वन्य वनस्पती व प्राणी, तसेच माणसांचे आणि जनावरांचे वैद्य आणि गावासंबंधी इतर महत्त्वाची माहिती या सगळ्याची पद्धतशीर नोंद करून ठेवणे म्हणजे पीबीआर.

शासनाचा, लोकसहभागातून करायचा हा अतिशय चांगला उपक्रम १५ वर्षांपूर्वीच अंमलात आणायला हवा होता. मात्र, हे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी सरकारकडून ठराविक रक्कम ग्रामपंचायतींना देण्याचे ठरले. पैसे मिळणार म्हणून विविध संस्थांनी या कामामध्ये उडी घेतली. राजकारण करून जास्तीत जास्त ग्रामपंचायती कशा मिळतील यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. या सगळ्यात पी.बी.आर.चा मूळ मुद्दा बाजूलाच राहिला.

वास्तविक यामध्ये गाव पातळीवर, जैवविविधता म्हणजे काय, तिचे संवर्धन करणे का गरजेचे आहे आणि त्या त्या गावामधील नैसर्गिक साधनसंपत्तीची जपणूक करून ठेवणे आजच्या काळाची गरज आहे या विषयी भरपूर जनजागृती करून पी.बी.आर.चा विषय जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याची खरी गरज होती.

गावामध्ये सर्वेक्षणासाठी गेल्यानंतर अनेक प्रकारचे अनुभव आले; जसे की आम्हाला सर्वेक्षणासाठी देण्यात येणाऱ्या निधीबाबत स्थानिक प्रतिनिधींची नाराजी, गावातील दोन गटांमधील मतभेद आणि महत्त्वाचे म्हणजे पी.बी.आर.ची संकल्पना लोकांपर्यंत न पोहोचल्यामुळे लोकांकडून मिळालेला कमी प्रतिसाद. काही गावांमध्ये जैवविविधता समितीदेखील स्थापन करण्यात आली नव्हती. या उलट, काही गावांमध्ये माणसांवर आणि जनावरांवर गावठी औषधे देणारे निपुण असे वैद्य आहेत, अनेक ठिकाणी गावाची एकात्मता टिकवून ठेवणाऱ्या धार्मिक परंपरा अस्तित्त्वात आहेत, देवरायांमध्ये प्रदेशनिष्ठ आणि दुर्मीळ अशा वनस्पती तसेच प्राण्यांचे अधिवास आहेत. पिकांची देशी वाणे आजही काही ठिकाणी शिल्लक आहेत. पूर्वजांनी पाळलेल्या जुन्या परंपरा आजही वैज्ञानिक निकषांबाबत अनभिज्ञता असली तरी हा ग्रामस्थ जपण्याचा प्रयत्न करत आहेत.

राष्ट्रीय हरित लवादाचा आदेश असल्यामुळे पीबीआरचा प्राथमिक सर्वेक्षणाचा अहवाल हा ३१ जानेवारी २०२०च्या आत शासनाकडे सुपूर्द करणे अनिवार्य होते.

मात्र, जैवविविधता नोंदवही तयार करणे हे काही १५ दिवसांत किंवा महिनाभरात होणारे काम नाही. ही किमान दोन वर्षे चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक ऋतूत येणाऱ्या वनस्पती, ऋतूगणिक साजरे केले जाणारे पारंपरिक उत्सव वेगवेगळे असतात. त्यामुळे प्रत्येक ऋतूत सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे .आता या सर्वेक्षणाचा प्राथमिक टप्पा पूर्ण झालेला आहे. ही प्रक्रिया पुढे चालणार आहे. ज्यांना या प्रक्रियेत निःस्वार्थीपणे सामील व्हायचे असेल, आपल्या गावासाठी काहीतरी काम करण्याची इच्छा असेल त्यांच्यासाठी अजूनही संधी उपलब्ध आहे. गावातील लोकांनी आपल्या गावासाठी केलेले काम हे अधिक पारदर्शक आणि तर्कशुद्ध असेल.

**- प्रतिक दिलीप नाटेकर**

लेखक वनस्पतिशास्त्रज्ञ असून कोकणात अध्यापन आणि संशोधन करतात.

ई-मेलः natekarpratik07@gmail.com

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa, 908 Deccan Gymkhana, Pune 411004